

अक्टोबर १९८४) दसरा–दिवाळी विशेषांक (किमत १ रु.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


**वर्ष ६३ वे )** **किंमत १ रुपया** **( अंक ७**

श्रीसाईलीला अक्टोबर १९८५ दूरध्वनी

दसरा-दिवाळी विशेषांक ८८२२५६१

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर. मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

जैसे गाणगापूर नृसिंहवाडी ।
जैसे औदुंबर वा भिल्लवडी ।
तैसेचि पवित्र गोदेचे थडी ।
क्षेत्र 'शिरडी' प्रसिद्ध ॥२९॥

गोदावरीचे पवित्रतीर ।
गोदावरीचे पवित्र नीर ।
गोदावरीचा शीतसमीर ।
हीं भवतिमिर नाशक ॥३०॥

गोदावरीचे माहात्म्य रुचिर ।
प्रख्यात जे अखिल जगतीवर ।
एकाहूनि एक धुरंधर ।
संत प्रवर तेथें झाले ॥३१॥

अनेक तीर्थे या गोमतीतीरीं ।
अघविनाशक जेथील वारी ।
भवरोग स्नानें पानें निवारी ।
पुराणांतरी वर्णिलें ॥३२॥

ते हे गोदा अहमदनगरीं ।
कोपरगांव तालुक्या भीतरीं ।
कोपरगावांचिया शेजारीं ।
मार्ग देई शिरडीचा ॥३३॥

— श्री साईसच्चरित अध्याय ४.

# सुविचार

आपदां कथितः पन्थाः
इन्द्रियाणां असंयमः ।
तज्जयः संपदां मार्गः
येनेष्टं तेन गम्यताम् ॥

—चाणक्य नीति शतकम्.

आपल्या इंद्रियांवर आपला ताबा नसणं हा आपत्तींचा मार्ग आहे. संकटांना आमंत्रण आहे; आणि इंद्रियांवर ताबा असणं हा संपत्तींचा सुखाचा मार्ग आहे. जो मार्ग इष्ट वाटेल त्या मार्गाने जा इंद्रियांच्या ताब्यात गेलं म्हणजे दुःख व आपत्ती प्राप्त होतात. इंद्रिये ताब्यात ठेवली म्हणजे सुख आणि संपत्ती प्राप्त होतात. माणसानं आपल्याला काय हवं ते ठरवून त्या मार्गानं जावं.

---


**शिरडीतील विजयादशमी उत्सव** — दरवर्षी प्रमाणे शिरडी येथे श्री विजयादशमी उत्सव यंदाही बुधवार ता. ३–१०–८४ ते शनिवार ता. ६–१०–८४ अखेर असे चार दिवस साजरा होणार आहे. तरी भक्त मंडळींनी हेच निमंत्रण समजून उत्सव प्रसंगी आपले कुटुंबिय व स्नेहमंडळींसह हजर राहून सर्व कार्यात सहभागी होऊन संस्थानलाही सहकार्य करावे अशी विनंती श्री. आर. डी. बक्षे कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान शिरडी हे करतात. संस्थानच्या दादर येथील कार्यालयात हाच उत्सव गुरु. ता. ४–१०–८४ रोजी साजरा होईल. दुपारी १२ वा. प्रसाद व आरती होईल.

# अनुक्रमणिका ऑक्टोबर १९८४


१) संपादकीय. – सर्वांसाठी झिजणारा संत.
२) श्रीसाईबाबा संस्थान शिरडी – विश्वस्त मंडळ
३) श्रीसाईबाबांचे महानिर्वाण – श्री. चंद्रकांत गरगटे.
४) सीमोल्लंघन. – कु. हेमलता केसकर.
५) श्री बाबांचे आध्यात्मिक ज्ञान. – श्री. सत्यवान गायकवाड.
६) बाबांमुळेच उत्सव साजरा. – सौ. वर्षा ढगे.
७) बाबांचा मंत्र. – श्री. गणेश बडगुजर.
८) मुलीचे पोट दुखणे थांबले. – सौ. रा. न. सावंत.
९) साईसंदेश. – श्री. अरविंद बारटक्के.
१०) बाबांची कृपादृष्टी – सौ. सुहास नाईक.
११) श्रीसाई सच्चरित वाचनानंतर – श्री. शाम जुवळे.
१२) उदीचा एक असाही चमत्कार. – सौ. अपर्णा प्रधान.
१३) श्रद्धेचे फल – सौ. नीता कालुष्टे.
१४) चालू युगात बाबांचे महत्त्व. – श्री. विजया सहामते
१५) श्रीसाईबाबांची भक्ती. – श्री. मुरलीधर घोलप.
१६) बाबांची उदी – महान औषध. – कु. सुजाता परळकर.
१७) श्री साई चमत्कार. – सौ. अनघा बंगाळे.
१८) साई माझी माऊली – श्री. टी. एन. चव्हाण.
१९) साईनाथांचा महिमा – सौ. सुधा गानला.
२०) जा शरण साईला – सौ. आसावरी वायकूळ.
२१) श्री बाबा – नाम महात्म्य. – श्री. भूरनदास बोरकर.
२२) श्री साईबाबांना ओवी – सौ. वसुंधरा चोरे.
२३) प्रार्थना. – श्री. दा. र. दळवी.
२४) अवतरला श्री साई – श्री. अजित पावसकर.
२५) प्रभो साईनाथ – सौ. कलावती चव्हाण.
२६) श्री साई नाम तुझे गोड लागू दे – श्री. वासुदेव काळे.
२७) साईचे ऋण – जयंती जोशी.
२८) परीसपदी – श्री. बी. जी. चव्हाण.
२९) नमन – सौ. शकुंतला रामटेके.
३०) श्रीसाईबाबांकडे काय मागावे. – श्री. लक्ष्मणराव नाईक.
३१) श्री बाबांचे निर्याण. – साईनंद.
३२) शिरडीवृत्त. – जुलै १९८४

# सर्वांसाठी झिजणारा संत — श्रीसाईबाबा

स. न. वि. वि.




सर्व संतांच्या चरित्रात थोड्याफार फरकाने काहीं गोष्टी सारख्या दिसून येतात. त्या अशा की, सर्व संतांचा सुरवातीला समाजाने फार उपहास केला. त्यांच्यावर हात टाकण्याससुद्धा कमी केले नाहीं. त्यांची छळणूक केली गेली. पण या संतांनी प्रतिकार न करता उलट प्रत्युपकार करून सर्वांची मने जिंकून घेतली आणि त्यांची विटंबना करणाऱ्यांची मात्र शेवटी छीः थू झाली. द्रव्य हे त्यांनी विष मानले, राव रंक समान लेखले, 'भले तरी देऊ कासेची लंगोटी' अशा वृत्तीने वागले, भीड नाहीं. लाचारी नाहीं, अत्यंत निस्पृह पण तितकेच उदार.

आपल्या श्रीसाईबाबांचेच उदाहरण घ्याना. एक वेडा फकीर म्हणून समजला गेलेला हा अवलिया. ना शिक्षण, ना ग्रंथ वाचन, ना ग्रंथ लेखन, निवासस्थान म्हणजे एक पडकी मोडकळीस आलेली मशिद. विंचू, पाली, उंदीर सर्प यांची सोबत. शिर्डी सारखा एक दरिद्री खेडेगाव. सुमारे शंभर वर्षांपूर्वीचा काळ, भिक्षा मागून मिळालेल्या ओल्या-कोरड्या भाकरीवर उदरनिर्वाह. कधी कुणी दिडकी दुगाणी दिली तर दिली. खर्चाच्या बाबी दोनच. तेल व तंबाखू.

कस्तुरी डबक्यात पडली तरी तिचा सुगंध लपून रहात नाहीं. आपली मशिद बरी की आपण बरे. समोर चोवीस तास जळत असलेली धुनी. प्रथम त्यांच्या जवळ कुणी जात नसे. पण पुढे पुढे लोकांचे कुतूहल जागे झाले. वाण्यांनी फुकट तेल देण्याचे नाकारले. बाबांनी तेलाशिवाय सर्व रात्रभर पणत्या जळत ठेवल्या बाबांच्या गुरुस्थानाचा शोध लागला. त्याचप्रमाणे या वेड्या फकिराची परोपकारी वृत्ती हळूहळू सर्वांच्या प्रत्ययास येऊ लागली. गोरगरीब त्यांच्याकडे जाऊ लागले. कुणाला दुखलं खुपलं तर औषध द्यावे

व गुण यावा येणाऱ्या जाणाऱ्यांनी कपाळी उदी फासावी. 'अल्ला भला करेगा' असा आशिर्वाद द्यावा. कुणी भेटायला आला की न विचारता तो कशासाठी आला आहे ते सांगावे, मुखावाटे निघालेला शब्द खरा व्हावा, अशा गोष्टी लोकांच्या अनुभवास येऊ लागल्या. गांजलेले, पीडलेले, दुःख निवारणासाठी त्यांच्याकडे येऊ लागले, व हळू हळू त्यांचा बोलबाला वाढत गेला.

बाबांकडे येणारे, त्यांची सेवा करणारे लोक होते. ब्राम्हणांपासून शूद्रापर्यंत रावापासून रंकापर्यंत बालापासून वृद्धापर्यन्त काही धनिक होते. काही विद्वान होते. गोरगरीब होते. खेडूत होते. बाबांनी इच्छा दर्शविली असती तर नागपूरला श्रीमंत गोपाळराव बुट्टींनी त्यांना स्वतंत्र बंगला बांधून देऊन सर्व सोयी पुरविल्या असत्या. त्यांनी मनात आणले असते तर अमरावतीला दादासाहेब खापर्ड्यांनी तशीच व्यवस्था करून दिली असती. बाबांनी मनात आणण्याचीच खोटी. पण बाबा कुणाच्याही आहारी गेले नाहींत. चमत्कारांचे मांडवल करून स्वतःच्या प्रसिद्धीसाठी त्यांनी कुठ दौरे काढले नाहींत. तसे करण्याची त्यांना जरूरच नव्हती. शेवटपर्यन्त आपल्या मशिदीत राहून पीडितांची सेवा केली. जरी ते शिर्डी सोडून कुठेही दुसरीकडे गेले नाहींत तरी आपल्या भक्तांना केव्हांही कुठही कोणत्यातरी रूपाने दर्शन देत. बाबा स्वतःच्या देहाच्या सुखसोयीसाठी जगले नाहींत. ते जगले ते दुसऱ्यांची दुःखें कमी करण्यासाठी, हलकी करण्यासाठी, नाहीशी करण्यासाठी. दुसऱ्यांची देह दुःखे नाहिशी व्हावीत म्हणून स्वतः देह दुःखे सोसली. त्यांचा आशिर्वाद, त्यांचा शब्द, व त्यांची उदी हेच रामबाण औषध होते. उपाय होता, विधिलिखित होते. ते अशिक्षित असून थोर ज्ञानी होते भिकारी असून उदार होते.

आपल्या भक्तांना त्यांनी कुठलीही कठोर उपासना करावयास सांगितली नाहीं. श्रद्धा व सबुरी हा महामंत्र दिला. व्यवहारात कसे वागावे. काय करावे आणि काय करू नये हे अगदी सोप्या भाषेत शिकविले, 'अहंकार सोडून मला शरण या. माझे स्मरण करा, तुम्ही कुठेही असा मी तुमच्या पाठीशी सदैव उभा आहे, कसली काळजी करू नका. असे ते आपल्या भक्तांना नेहमी सांगत 'अरे मी मेलो तरी माझी कबर तुमच्या बरोबर बोलत राहील तुमची दुःखे दूर करील,' बाबांनी आपल्या भक्तांना दिलेले हे आश्वासन त्यांची शिर्डीची जागती समाधी आज खरे करून दाखवित आहे. बाबांच्या वास्तव्यामुळे शिर्डीसारखा एक खेडेगाव आज एक तीर्थक्षेत्र झाला आहे. पीडितांचे आश्रय

स्थान झाला आहे. बाबांची मशिद–द्वारकामाई–बाबांच्या भक्तांना आईच्या वात्सल्याने पोटाशी धरून त्यांच्या पाठीवरून मायेचा हात फिरवित आहे. त्यांचे नैराश्य, त्यांचे वैफल्य दूर करून धीर देत आहे, आणि सांगत आहे, 'बाळांनो रडू नका, हताश होऊ नका काळजी करू नका. बाबा सर्वांचे भले करतील.'

श्रीसाईबाबा हे खरेखुरे गरिबांचे कनवाळू होते. ते म्हणत, 'गरिबी अव्वल बादशाही । अमीरीसे लाख सवाई । गरिबोंका अल्लाभाई । अक्षयी साई वदत की ॥५–६८॥ येणाऱ्या संकटाची ते भक्तांना अगोदरच कल्पना देऊन सावध करीत. कुण्या भक्तांच्या मनात जर काही कुकल्पना आली, विकल्प निर्माण झाला तर त्यांना ते न सांगता समजत असे. अशावेळी ते भक्तांना त्यांची चूक दाखवून देत. समज देत. भक्त बिचारा खजील होऊन जाई. भक्ति–भावाने दिलेली कोणतीही लहान वस्तू बाबा आवडीने स्वीकारीत भक्षण करीत. मग तो उष्टा पेढा असो, खिचडी असो, वांग्याचे भरीत असो, वालपापडी शेंगा असोत किंवा नारळ असो. त्यांनी भक्तांची नाना प्रकारची संकटे दूर केली नाना प्रकारचे व्याप सांभाळले पण कुठला अहंकार नाहीं. गर्व नाही, बढाई नाहीं, उलट ते म्हणत 'मी ना देव ना ईश्वर । मी ना 'अनल हक्क' ना परमेश्वर । 'यादे हक्क' मी यादगार। बंदा मी लाचार अल्लाचा ॥

बाबांच्या शिर्डीला गेल्यावर कुणाला दमडीसुद्धा देण्याची सक्ती केली जात नाहीं. इथे कुणी दलाल नाहीं, कुणी मध्यस्थी नाहीं, कुणाला मज्जाव नाहीं, कुणाची चिठ्ठी चपाटी बरोबर न्यावी लागत नाहीं. दर्शनासाठी तिकीट, पास किंवा प्रवेश पत्रिका विकत घ्यावी लागत नाहीं. श्रीसाईबाबांनी आपल्या पश्चात आपली गादी चालविण्यासाठी कुणाचीही नेमणूक केलेली नाहीं, किंवा इथे त्यांचा कुणी पट्ट शिष्य नाहीं, इथे आहे ती फक्त श्रीसाईबाबांची जागती समाधी. कुणीही यावे, समाधीचे दर्शन घ्यावे. आपले दुःख निवेदन करावे, श्रीसाईबाबांची मनोभावे प्रार्थना करावी. कृतज्ञतेचे अश्रू गाळावे, आणि समाधानाने घरी परतावे. बस्स इतकेच. 'जया मनी जसा भाव, तया तैसा अनुभव" हेच एक शिर्डीच्या यात्रेचे मुख्य सूत्र आहे.'

# श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे विश्वस्त मंडळ

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांचा कारभार गेली २४ वर्षे कोर्टाचे ताब्यात होता. तो दिनांक १ सप्टेंबर १९८४ पासून प्रशासकीय अधिकारी व त्यांचे विश्वस्त मंडळ यांचे हाती सुपूर्त करण्यात आला. साईभक्तांचे माहितीसाठी त्यांची नांवे प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

| | |
|---|---|
| श्री. आर्. डी. बन्ने | प्रशासकीय अधिकारी |
| श्री. पी. के. सावंत | अध्यक्ष |
| श्री. तुकाराम रा. बोरावके | सभासद |
| श्री. श्रीपाद बा. दर्प | –,,– |
| श्री. सिताराम एस्. धानू | –,,– |
| श्री. एम् नेमिचंद जैन | –,,– |
| श्री. कन्हैयालाल एच्. काकरे | –,,– |
| श्री. प्रकाश व. कारखानीस | –,,– |
| श्री. भिमाशंकर व्यं. खांबेकर | –,,– |
| श्री. विश्वास बा. खेर | –,,– |
| श्री. मोरेश्वर के. कीर्तिकर | –,,– |
| श्री. के. आर्. कोळी | –,,– |
| श्री. वसंत एम्. कोन्हाळकर | –,,– |
| श्री. नटवरलाल सी. मोदी | –,,– |
| श्री. संभाजी व्ही. सावंत | –,,– |
| श्री. जे. पी. सावे | –,,– |
| श्री. जयंतीभाई आर. शहा | –,,– |
| श्री. गणपतराव ठ. शेळके | –,,– |
| श्री. शिवराम रा. शिंदे | –,,– |
| श्री. विनायक श्री. आपटे | कर्मचारी प्रतिनिधी |
| कु. रेखा ग. दिघे | महिला प्रतिनिधी |

※ ※

# श्री साईबाबांचे महानिर्वाण

–श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे
३९९, गुरुवार पेठ,
सातारा – ४१५ ००२.

० महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या मायभूमीत अनेक महान संत होऊन गेले. या संतांनी आपल्या मधुर वाणीच्या द्वारे लोकांना उपदेश करून हितकारक व प्रेरणात्मक बोधामृत दिले.

आधुनिक काळामध्ये म्हणजे इ. स. १८५८ मध्ये नगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यामध्ये शिरडी नावाच्या गावी श्रीसाईबाबा प्रगट झाले. श्री साईबाबा हे महान अवतारी पुरुष होते. ते अयोनिज व अजानबाहू होते. श्री साईबाबांनी मंगळवार दि. १५ आक्टोबर १९१८ विजयादशमी रोजी दुपारी २ वाजून ३५ मिनिटांनी आपले अवतार कार्य संपविले. श्री साईबाबा समाधिस्थ होऊन आज ६६ वर्षे पूर्ण होत आहेत. परंतु आज देखील श्री साईबाबा कित्येक भक्तांना दृष्टान्तरुपाने अथवा व्यक्तीच्या रूपाने दर्शन देतात याची प्रचिती येते.

श्री साईबाबा हे शिरडीत आले त्यावेळी त्यांची भेट श्री खंडोबा मंदीराचे पुजारी म्हाळसापती यांच्या बरोबर झाली. म्हाळसापती हे श्री साईबाबांचे भक्त बनले. त्यानंतर काशिराम शिंपी, शामा उर्फ माधवराव देशपांडे, तात्या कोते, काकासाहेब दीक्षित, बायजाबाई, राधाकृष्णा आई, लक्ष्मीबाई शिंदे, उपासनी महाराज, बापूसाहेब जोग, बापूसाहेब बुट्टी इ. सारखे अनेक भक्त-रत्न त्यांना लाभले. बाबांनी आपल्या सहवासामध्ये, असलेल्या सर्वच भक्तांचा उद्धार केला.

श्री साईबाबा हे शिरडीत आले तेव्हां त्यांच्याजवळ एक वीट होती. बाबा त्या विटेची अतिशय काळजी घेत असत. बाबा या विटेला टेकून प्रहरचे प्रहर मशिदीत घालवित असत. रात्री झोपताना ती वीट बाबा उशाला घेत असत. बाबांचे त्या विटेवर अतिशय प्रेम होते. एक दिवस एक मुलगा मशीद

झाडत असताना त्याने ती वीट उचलली व स्वच्छता करुन नंतर त्या जागेवर ठेवावी या उद्देशाने त्याने ती उचलली होती परंतु त्याच्या हातातून निसटून ती खाली पडली व तिचे दोन तुकडे झाले. वीट फुटल्याचे बाबांना समजताच त्यांना अतिशय वाईट वाटले. ते मनामध्ये कळवळले, आणि दुःखी झाले. मी आता राहणार नाहीं. त्यानंतर बाबांनी एक आठवड्यातच आपला अवतार संपविला ते समाधिस्थ झाले.

श्री साईबाबा समाधिस्थ होण्यापूर्वी म्हणजे त्यांचा अंतःकाळ येण्याअगोदर ते थोडे आजारीच होते. बाबांनी त्यावेळी जाणलेले होते की, आपला अंतःकाळ जवळ आलेला आहे. या निमित्ताने बाबांनी शेवटच्या तीन दिवसात वझे नावाच्या भक्तास "रामविजय" वाचण्यास सांगितले. बाबांनी या कालावधीमध्ये अनेक भक्तांना उपदेश केले. लक्ष्मीबाई शिंदे यांना बाबांनी ९ रुपये दक्षिणा दिली व त्यांना संतुष्ट केले.

बाबांचा अंत अगदी निकट येऊन पोहचलेला होता. त्यावेळी बयाजी आप्पा कोते या भक्ताच्या मांडीवर बाबांनी डोके टेकले आणि अखेरचा श्वास सोडला. त्यावेळी सर्व भक्तगण हे दृष्य पाहून हंबरडा फोडू लागले, कारण प्रत्यक्ष आपला परमेश्वर, कर्ता करविता आपणास सोडून गेला, अनाथांचा नाथ गेला, दीनांची माऊली सर्वांना सोडून गेली. सर्वत्र दुःखाची छाया पसरली होती. आकाशातील पक्षी आपला विहार थांबवून ती देखील आपले दुःख व्यक्त करण्याकरिता सर्वांच्या दुःखांमध्ये सामील झाली होती. वृक्ष वेलींची पर्णफुले दुःखाने कोमेजली होती आणि आपली हालचाल बंद करुन आपली घडण करणाऱ्या परमेश्वराने (साक्षात् श्री साईबाबांनी) मिटलेले डोळे पुन्हा उघडावेत आणि सर्व जनांना आनंदीत करावे व आपण स्वतः त्यांच्या चरणकमलांची धूळ बनून जीवन सार्थकी लागावे, अशी याचना करीत होते. सर्वच वातावरण, दुःखी होऊन गेले होते.

शिरडी गावातील स्त्रिया, पुरुष, लहान मुले सर्वजण दुःखी झाली होती. सर्वत्र दुःखाचा डोंगर पसरलेला होता. अश्रूंच्या प्रचंड सागरामध्ये सर्वजण बुडालेले होते. प्रत्येक भक्ताच्या मुखामध्ये एकच करूण शब्द होता, बाबा! तुम्ही आम्हास असे सोडून एकटेच का निघून गेलात आम्हांस निराधार करुन सोडून का गेलात? तुम्हाविना आम्हांला आता कोण त्राता आहे. हा करुणमय

प्रसंग पाहून सर्वांचे कंठ दाटून आले. सर्व भक्त श्री साईबाबांच्या अंत्य दर्शनाकरिता द्वारकामाईमध्ये गर्दी करू लागले.

श्री साईबाबांचे हे निर्वाण होण्याअगोदर शके १८३८ च्या विजयादशमीच्या दिवशी सायंकाळच्या वेळी बाबांनी एकदम उग्र रूप धारण केले होते. अंगातले सर्व कपडे काढले आणि ते धुनीमध्ये टाकले. ते दिगंबर अवस्थेत सर्वांसमोर उभे राहिले आणि म्हणाले, "आता तुम्ही ठरवा की मी हिंदु आहे की मुसलमान आहे ते नीट पाहून घ्या" हे दृश्य पाहून सर्व मंडळी गडबडली नंतर भागोजी नावाच्या भक्ताने पुढे होऊन त्यांना शांत केले आणि वस्त्र परिधान करण्यास भाग पाडले. काहीं वेळानंतर बाबांनी वस्त्र परिधान केले नंतर पुढील कार्यक्रम पार पडला.

विजयादशमी १९१८ साली बाबांनी आपला देह ठेवला. त्या आधी एक घटना घडली ती अशी की, शिरडी गावचे त्यावेळचे पाटील रामचंद्रदादा हे अतिशय आजारी होते. त्यांचे दुखणे दिवसे दिवस वाढतच चालले होते. तेव्हां एक दिवस बाबांचा दृष्टान्त रामचंद्र दादांना झाला. बाबांनी दृष्टान्तामध्ये त्यांना सांगितले, "अरे तू काळजी करू नकोस, तुझे मरण अजून लांब आहे. तू बरा होशील तेव्हां तू व्यर्थ चिंता करण्याचे कारण नाहीं. तुझ्या मरणाचे भय टळून गेलेले आहे तेव्हां तुला भिण्याचे कारण नाहीं." परंतु तात्या कोते पाटील याची जगण्याची धडगत काही दिसत नाहीं, तात्या पाटील मरणार आहे याबाबत मात्र कोणालाही काहींही सांगू नकोस. उगाच तो झुरत राहिला. तेव्हांपासून रामचंद्र पाटील हळूहळू बरे होत गेले. ही गोष्ट रामचंद्र पाटलाने बाळा शिंप्याच्या कानावर घातली आणि सांगितलेली गोष्ट खरीच ठरली. तात्या पाटलाने अंथरूण धरले. त्यानंतर काही कालावधी गेल्यानंतर बाबा देखील दुखण्याने आजारी पडले. तात्या पाटील श्री साईबाबांचे चिंतन करीत होता. दसरा जवळ आला तेव्हां बाळा शिंपी व रामचंद्र पाटील यांना भिती वाटू लागली. तात्या पाटलाची तब्येत देखील हळूहळू गंभीर स्वरूपाची वाटू लागली आणि आश्चर्याची गोष्ट अशी घडली की श्री साईबाबांनी आपला देह ठेवला, व तात्या पाटील हळू हळू बरे होऊ लागले.

बाबांनी देह ठेवला त्या अगोदर म्हणजे मार्गशीर्ष पौर्णिमा १८८६ ला

आपल्या अचाट योग बळाचे सामर्थ्यावर तीन दिवस ब्रम्हांडी आत्मा चढविला होता ती एक मोठी चमत्कारिक गोष्ट आहे.

बाबांना दम्याचा विकार झाला होता. त्याचा जोर अतिशय वाढला तेव्हां हा देहभोग सहन करण्यासाठी बाबांनी ब्रम्हांडी आत्मा चढविला श्री. म्हाळसापतींना बाबा म्हणाले, " मी ब्रम्हांडी प्राण नेतो आहे. कोणताही विचार मनात न धरता तीन दिवस मला सभामंडपातील या कोपऱ्यात समाधी लावून ठेवून द्या. त्या ठिकाणी दोन निशाणे लावून ठेवा."

आणि असे म्हणता म्हणता बाबांनी ब्रम्हांडी प्राण चढविला. रात्रीचे दहा वाजलेले होते तेव्हां तिथे जमलेले सर्व लोक आश्चर्यचकित होऊन गेले होते. श्वास बंद होता, त्यांची नाडी चालत नव्हती. सर्वांना आता असे वाटू लागले की खरोखरच बाबांनी प्राण सोडला. त्यावेळी संपूर्ण शिरडी गावातील लोक गोळा झाले. बाबांनी समाधी खोदण्याची आज्ञा दिली होती. परंतु तसे करायला कोणाचाच धीर होईना. म्हाळसापतींनी बाबांचे डोके मांडीवर घेतले होते. लोकांना असे वाटू लागले की, आपल्या आकस्मिक निधनाने भक्तांना एकदम धक्का बसेल म्हणून बाबांनी तीन दिवस आपल्याला राखण्याचा आदेश दिला असावा. दोन दिवस झाले फकीर, मौलवी, गावातील प्रतिष्ठित लोक आले. सर्वांनी विचार केला की, बाबांनी इहलोक सोडलेला आहे तेव्हां त्यांची उत्तरक्रिया करणे योग्य आहे. परंतु जे निष्ठावान भक्त होते त्यांना हे मान्य झाले नाही. तीन दिवस आपला देह रक्षण करण्याची आज्ञा बाबांनी दिली आहे ती पालन केलीच पाहिजे. तीन दिवस पूर्ण झाले. पहाटे तीन वाजता बाबांच्या देहात चेतना निर्माण होत आहे असे दिसून आले. बाबांनी हालचाल सुरू केली. डोळे उघडले आणि प्रसन्न वदनाने ते उठून बसले.

त्यानंतर बाबांची ही अनाकलनीय लीला पाहून भक्तांच्या आनंदाला एकदम पूर आला तो अवर्णनीय आहे. लोकांनी जयजयकार करण्यास सुरूवात केली. बाबांच्या दर्शनाकरिता सर्व गावकरी गर्दी करू लागले. श्री साईबाबांनी स्वतःच्या देहपाताची अचूक वेळ देखील आपल्या अचाट योगबलाच्या सहाय्याने ओळखली होती. कारण बाबांना जन्मजात अष्टसिद्धिची प्राप्ती होती. आपल्या उदीच्या महाप्रभावाने त्यांनी अनेक भक्तांच्या व्याधी, संकटे, निवारण केली ती देखील या अष्टसिद्धिच्या जोरावरच.

श्री साईबाबांनी १९१८ साली देह ठेवल्यानंतर त्या देहाचे काय करावयाचे या विचाराने सर्वजण चिंताक्रांत झाले. हिंदुचे म्हणणे होते की, हिंदु संस्काराप्रमाणे बाबांना बुट्टींच्या वाड्यात ठेवू तर मुस्लीमांच्या मते त्यांना कबरस्तानात नेऊ या. दोन्हींही गटांमध्ये झगडा सुरू झाला.

गावच्या पाटलांनी एकच सांगितले की, बाबांना इतरत्र बाहेर कोठेही ठेवल्याचे आम्हांला आवडणार नाहीं. बाबांचा देह ठेवला तर वाड्यातच ठेवू. यावर पुन्हां विचार विनिमय होऊन सर्वांची मते घेतली गेली. त्यामध्ये हिंदुच्या बाजूंनी भरपूर मते पडली आणि बाबांचा देह बुट्टी वाड्यातच ठेवण्याचा निश्चय करण्यात आला. त्यानंतर दोन्ही गटातील मतभेद मिटले गेले. बुट्टी वाडा हा श्री मुरलीधराची मूर्ती स्थापन करण्याकरिता बांधलेला होता. परंतु बाबांनी आपला अवतार संपविण्या अगोदर सांगितलेले वाक्य सर्वांच्या लक्षात होते. बाबांनी आजारी असतानाच सांगितलेले होते की, "मला आता बरे वाटत नाहीं तर मला बुट्टींच्या दगडी वाड्यात घेऊन चला." त्याप्रमाणे बाबांचा देह बुट्टींच्या वाड्यात आणला गेला.

बाबांचा देह सजवण्यात आला त्यांना बसलेल्या अवस्थेत ठेवण्यात आले. त्या देहाची पुजा–आरती नित्याप्रमाणे केली गेली. ही आरती लक्ष्मण मामांनी केली होती. ही आरती करण्याकरिता मुसलमान भक्तांनी थोडा विरोध देखील केला परंतु लक्ष्मण मामांना बाबांनी दसऱ्याला जो दृष्टांत दिला होता तो त्यांनी लोकांना कथन केला, "तू माझी पूजा व आरती कर."

त्यानंतर सर्वांच्या मते, श्री साईबाबांची पुजा–आरती लक्ष्मण मामांनी केली. मुस्लीम भक्तांनी आपले विचार बाजूला ठेवून ते हिंदु भक्तांच्या विचारांमध्ये समरस झाले व सहकार्य करण्याकरिता पुढे आले.

परंतु या वाद–विवादामध्ये बाबांचा देह छत्तीस तास म्हणजे दीड दिवस तसाच बसून राहिला होता.

दि. १६ आक्टोबर १९१८ बुधवारी बाबांचा देह मशिदीतून हलविला. हिंदूशास्त्रा प्रमाणे सर्व संस्कार केले जात होते. बाबांना स्नान घातले. त्यांची पूजा केली गेली.

त्यानंतर सर्व भक्तांनी अंत्य दर्शन घेतले व तो देह बुट्टींच्या वाडी वाड्यात आणला गेला. जी ठरलेली जागा होती त्यामध्ये तो देह ठेवला गेला. त्याच्यावर सर्व शास्त्रोक्त संस्कार केल्यानंतर तो देह समाधिस्थ केला गेला.

श्री साईबाबा समाधिस्थ होऊन आज ६६ वर्षे पूर्ण होत आहेत. शिर्डी येथे नाना धर्मांचे नाना जातींचे लोक श्रद्धेने दर्शनाकरिता येतात. बाबांच्या महासमाधिचे दर्शन घेतात. बाबांचा आशिर्वाद घेऊन परत येतात आणि येताना बाबांच्या वचनाची प्रचिती घेऊनच माघारी येतात.

सद्गुरु श्री साईबाबांच्या समाधिला माझे कोटी कोटी प्रणाम !

**साईभक्त कलाकार कांबळी परदेश दौऱ्यावर**

० साईभक्त व रंगभूमीवरील एक आघाडीचे नट कलाकार भद्रकाली प्रॉडक्शनचे चालक–मालक श्री. मच्छिंद्रनाथ नवनाथ कांबळी हे आपली नाटके व नाट्य कलाकार संचा समवेत आक्टोबरचे मध्यास लंडनला जात आहेत. आपल्या मुक्कामात ते लंडन व परिसरातील परगण्यांतून आपल्या विविध मराठी नाटकांचे प्रयोग खास करून तेथील मराठी मंडळींसमोर सादर करणार आहेत. नोव्हेंबरच्या अखेरीस ते मायदेशी परततील. लहानपणापासून विविध आपत्तींना व अनेक अडीअडचणींना मोठ्या धीराने तोंड देऊन गरीबीतून कष्टाने वर येऊन आता मराठी रंगभूमीवर मानाचे स्थान मिळविणाऱ्या या साईभक्त व प्रॉमिसिंग तरुण नट कलाकारास आमच्या हार्दीक शुभेच्छा.

# सीमोल्लंघन

—कु. हेमलता न. केसकर.
१८२, कसबा पेठ, फलटण.

दसरा सण मोठा
नाही आनंदा तोटा ।

० दसरा म्हटले की प्राचीनकाळी होऊन गेलेल्या अनेक घटना मनात गर्दी करतात. देवी महिषासूर मर्दिनीने महिषासुराचा वध केला तो हाच दिवस. प्रभु रामचंद्रांनी रावणाचा वध करून विजय मिळविला ते याच दिवशी, पांडवांनी अज्ञातवासातून परत आल्यावर शमीच्या झाडात ठेवलेली शस्त्रे बाहेर काढली तो विजयादशमीचाच दिवस होता. म्हणूनच दसरा हा दिवस युद्धोत्सुक राजांना शत्रूवर विजय मिळविण्यास अत्यंत महत्त्वाचा वाटतो. अनेक राजांनी युद्धावर जाण्यासाठी या दिवशी सीमोल्लंघन केले. सामान्य व्यवहारी लोक विजयादशमी हा शुभमुहूर्त मानतात, अनेक चांगल्या गोष्टींचा शुभारंभ या दिवशी करतात.

याशिवाय साईभक्तांच्या मनात प्रकर्षाने येणारी आणखी एक घटना या दिवशी घडली, ती म्हणजे पूज्य साईबाबांचे महानिर्वाण. ६६ वर्षापूर्वी म्हणजे इ. स. १९१८ मध्ये साईबाबांनी शिरडी येथे आपला देह ठेवला. साईभक्तगणांचे अंतःकरण हेलावणारी ही घटना. ज्यावेळी साईबाबांनी महानिर्वाण केले, त्यावेळी माधवराव देशपांडे (शामा), बयाजी पाटील, नानासाहेब निमोणकर इ. भक्तमंडळी त्यांच्या जवळ होती. परमप्रिय बाबा पंचत्वात विलीन झालेले कळताच सर्वांना अतीव दुःख झाले. साईबाबांचे सर्व भक्त द्वारकामाईत येऊन दुःख करू लागले. निश्चेष्ट पडलेल्या बाबांच्या देहाकडे पाहून त्यांना आपले अश्रू आवरेनात. शिरडी गावातले चैतन्य हरपले, सूर्याची किरणे निष्प्रभ झाली, वातावरणात उदासीनता पसरली. कारण साईबाबा म्हणजे परमेश्वराची सगुण साकार मूर्ती. सर्वांची त्यांच्या ठायी श्रद्धा होती, प्रत्येकजण बाबांना आपले मानत होता. साईबाबा हे ऐहिक व पारमार्थिक

श्री साईबाबांनी आपल्या कृती–उक्तीतून जे सांगितले ते आपल्याला जीवनात खूप मार्गदर्शक होईल असे आहे. साईबाबांची शिकवण अंगी बाणवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्यामुळे दुसऱ्यास त्रास होईल असे वर्तन करू नये, दु:खितांचे दु:ख दूर करण्याचा यथाशक्ति प्रयत्न करावा. धर्मकल्पनेवरून वादविवाद करू नये, भुकेलेल्याला अन्न द्यावे, ह्या गोष्टी करणे म्हणजे श्रीबाबांची डोळस भक्ति करणेच होय. ह्याप्रमाणेच साईबाबांचे पुण्यस्मरण करणे हेही औचित्यपूर्ण आहे. कारण

**जरी मी गेलो हे शरीर टाकून**
**तरीही धावेन भक्तांसाठी –**

जरी मी हे शरीर टाकून गेलो तरी मी जिवंत आहे, आणि याची प्रचिती तुम्ही घ्या, अशी ग्वाही दिली आहे म्हणजे साईबाबा हे गेले नाहीत. ते नित्य जिवंत आहेत, व जिवंतच राहणार, जन्ममृत्यु ही जड देहाची मर्यादा आहे. देह पंचमहाभूतात विलीन झाला, पण श्री बाबा हे जन्ममरणातीत आहेत, सर्वकालीन आहेत. सर्व ठिकाणी आहेत. आपल्या भक्तांच्या अगदी समीप आहेत, त्यांच्या अंतःकरणात आहेत,

**मग जो गाई वाडे कोडे**
**माझे चरित्र माझे पवाडे,**
**तयाचिया मी मागेपुढे,**
**चोहोकडे उभाचि –**

(अ. ३ ओ. १२).

दसऱ्याच्या दिवशी श्री बाबांनी इहलोकातून परलोकात सीमोल्लंघन केले ते नाहीत म्हणून खद करण्यापेक्षा ते सर्वत्र आहेत, माझ्या पाठीशी आहेत, माझ्या अंतःकरणात आहेत, म्हणून त्यांनी जे सांगितले तेच मी आचरणात आणण्याचा प्रयत्न करीन, म्हणजे श्री बाबांचे पुण्यस्मरण केल्यासारखे होईल.

# श्री साईबाबांचे आत्मविचार करायला लागणारे आध्यात्मिक ज्ञान

—श्री. सत्यवान गायकवाड
३१९ नवी खडकी, येरवडा
पुणे — ४११ ००६.

नाही परमात्मा । सांगे ज्यास आत्मा ।
त्यास एक चिंता । गूढ काय ।।

० बाबा अद्वैतवादाचे पुरस्कर्ते होते. अद्वैतवाद म्हणजे आत्मा व परमात्मा यांच्यातील एकता. सर्व चराचर सृष्टीत, चेतन, अचेतन सृष्टीत परमेश्वर व्यापला आहे ही मांगल्यपूर्ण भावना.

जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. हिंदू धर्मात अद्वैतवादाची श्रेष्ठ परंपरा आहे. त्याचाच पुरस्कार बाबांनी केला.

"अवतार हा निरनिराळ्या काळी, जगाच्या निरनिराळ्या भागात वेगवेगळ्या नावारूपानी प्रकट होतो. भूतलावरील त्याचे आगमन हे नेहमी मानवजातीच्या आध्यात्मिक पुनर्जन्माच्या वेळीच घडून येत असते. त्यामुळे तो मानवधारी देहात प्रकट होण्यापूर्वीच्या नजिकच्या मानव जातीला आगामी पुनर्जन्माच्या तीव्र प्रसूतीवेदना सहन कराव्या लागतात. या काळात मानव, पूर्वी कधी नव्हता एवढा वासनांचा गुलाम बनतो, लोभाच्या आहारी जातो, भयाने ग्रस्त होतो आणि रागाच्या तडाख्यात सापडतो. श्रीमंत लोक गरिबांवर जुलूम करतात मूठभर सत्ताधारी लोकांच्या फायद्यासाठी बहुजन समाजाची वागणूक केली जाते. मनाला शांती किंवा स्वस्थता न मिळाल्याने, मनुष्य कृत्रिम उत्तेजन देणाऱ्या गोष्टींमध्ये स्वतःला विसरण्याचा, हरवण्याचा प्रयत्न करतो. अनिती बोकाळते, गुन्हेगारी फैलावते. धर्माची चेष्टा होते. समाजाच्या सर्व थरात लाचलुचपतीचा प्रादुर्भाव होतो. युद्धे भडकतात. मानव हताश होतो विनाशाची लाट थोपवून धरण्याची कोणतीही शक्यता दिसेनाशी होते. नेमक्या अशाच वेळी अवतार प्रकट होतो. परमात्म्याचा मानव देहातील तो संपूर्ण आविष्कार

बनतो, आणि बाबांसारखे देवरूपी अंश या पृथ्वीवर येतात व आध्यात्मिक ज्ञान देऊन धन्य करतात.

बाबा भक्तांना उदी देत. त्यातून त्यांना अनासक्ती, वैराग्यता आणि अध्यात्मिक ज्ञान इ. गुणांचा बोध भक्तांच्या हृदयावर ठसवायचा होता. त्याची प्रचिती खालील सत्य कथा पाहिल्या नंतर सहज येईल.

वांद्र्याचे बाबासाहेब तर्खड हे प्रार्थना समाजाचे अनुयायी होते. पण त्यांचा मुलगा व पत्नी निस्सीम साईभक्त होत्या. बाबांच्या दर्शनाकरिता म्हणून ते दोघे शिरडी मुक्कामी आले. शिरडीस येताना मुलाने आपल्या वडिलांना सांगितले होते की श्री बाबांच्या फोटोस नैवेद्य दाखविल्या शिवाय अन्न ग्रहण करू नका. कारण मुलगा नित्य नियम काळजीपूर्वक पाळीत होता. वडिलांनी मुलाच्या सांगण्यास होकार दिला. नंतर आई व मुलगा निश्चित मनाने शिरडीस आली. बाबांची सेवा करू लागले. एकदा विसरपणे तर्खड श्री बाबांना नैवेद्य दाखवावयास विसरून गेले. द्वारकामाईत श्री बाबा बसले होते. जवळच तर्खड बाई व त्यांचा मुलगा होता. त्यांच्याकडे बाबा पहात म्हणाले, "काय करावे बाई! मी आज तुमच्या घरी गेलो होतो. परंतु मला उपाशी पोटी परत यावे लागले. मला फार भूक लागली होती व्याकूळ झालो होतो शेवटी मला तसेच परत यावे लागले!" मुलान तर्क केला, नक्कीच आपले वडील बाबांना नैवेद्य दाखविण्यास विसरून गेले. त्याशिवाय बाबा असे म्हणणार नाहीत. मुलाने लगेच पत्रव्यवहार करून विचारले. तेव्हां बाबांनी सांगितलेली घटना सत्य ठरली. यातूनच आपल्याला श्री बाबांचे आत्म विचारांचे ज्ञान प्राप्त होते.

एक दिवस नानासाहेब चांदोरकर बाबांचे पाय चेपत बसले होते. त्यावेळी मशिदीत कोणीच उपस्थित नव्हते. अशावेळी नाना गीतेतला एक श्लोक तोंडाने पुटपुटत होते "तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया!" हा वेळेपावेतो, बाबांना संस्कृत येते ही गोष्ट कुणालाच ठाऊक नव्हती. म्हणूनच चांदोरकर मनमोकळेपणाने तो श्लोक पुटपुटत होते. बाबा त्यांना म्हणाले," नाना तुझ्या त्या संस्कृत शब्दाचा एक–एक अथ सांग पाहू' चांदोरकर ते ऐकून बाबांच्या तोंडाकडे पहातच राहिले. शंकराचार्यांच्या टीकेवरून त्यांनी त्या श्लोकाचा अर्थ समजावून घेतला होता. त्या प्रमाणे त्यांनी शब्दांचा अर्थ सांगायला सुरवात केली.

बाबांनी सारे ऐकून घेतले आणि मग त्या संस्कृत श्लोकाचा नवा अर्थ सांगायला सुरवात केली. एकेका संस्कृत शब्दाचा ते मराठी अर्थ सांगत होते. बाबा म्हणाले –

उपदेश्यंती ते ज्ञानम्' असे जे त्या श्लोकात आहे ते उपदेश्यंती ते अज्ञा-नम्' असे वाचायला हवे' बाबांची ती टीका ऐकून चांदोरकरांसारखा संस्कृत विद्वानही थक्क झाला. नाना जरा ऐक प्रणिपातेन म्हणजे आपल्या गुरुला शरण गेले पाहिजे नुसतेच गुरुपुढे लोटांगण घालून चालणार नाहीं. परिप्रश्नेन म्हणजे गुरुला बिकट प्रश्न विचारायला हवेत आणि गुरुच्या उत्तरामुळे तुमचे आध्यात्मिक ज्ञान वाढायला हवे. हे सर्व ऐकून नानांचा आत्मविचार वाढला व आध्यात्मिक ज्ञान त्यांना प्राप्त झाले.

श्री बाबा शामा आणि हेमाडपंत यांना म्हणाले आत्मज्ञान प्राप्त करुन घेण्यासाठी तुम्ही दोघांनी सतत साधना करायला हवी. तसे केल्याने तुम्हांला तुमच्या वृत्ती काबूत ठेवता येतील श्रीहरीचे चिंतन करा. सर्व प्राणिमात्रांमध्ये ईश्वरी अंश आहे हे विसरू नका. तुम्ही तुमचे मन निश्चल करायला हवे, निर्विकार करायला हवे. तुम्ही तुमचे मन निश्चल केल्यावर आध्यात्म प्राप्त होईल आणि तुम्ही दोघे या मानव जन्मात सुखी व्हाल.

राधाबाई देशमुख या महिलेने बाबांजवळ गुरुमंत्र मागितला तेव्हां श्री बाबा म्हणाले आई मला माझ्या गुरुनेच गुरुमंत्र दिला नाहीं मग मी तरी तुला गुरुमंत्र कुठून देऊ. तुला गुरुमंत्राची काही जरूरी नाहीं. आध्यात्मिक ज्ञान प्राप्त कर आणि आत्म्याला विचार करायला लाव. तोच खरा मार्ग सुखकारक आहे. आध्यात्म्यज्ञान म्हणजे काहिहीं कठीण नाहीं. त्याकरिता जपजाप्य करावे लागत नाहीं किंवा रानोमाळ जाऊन कडक साधना करावी लागणार नाहीं. आध्यात्म्याचे ज्ञान आपल्या आत्मविचाराजवळ आहे. त्याला तू जागा कर. कोणाकडून गुरुमंत्र घेऊ नकोस. आत्मविचार म्हणजे आध्यात्माची सांगड. ती सांगड तू घाल. माझ्याकडे चित्त एकाग्र कर. माझ्या शब्दावर विश्वास ठेव. सबुरीमुळे विजयश्री जवळ येते. श्रद्धा आणि सबुरी या दोन्ही सख्या बहिणी आहेत त्यांची कांस तू धरायला हवीस म्हणजे बनता बनता बनेल व या जागी तुला आध्यात्मिक ज्ञान प्राप्त होईल. तू सुखी होशील. आये आता तू घरी जा. ज्या ज्या वेळी तू माझी आठवण करशील त्या त्या वेळी मी तुझ्या जवळच असेन.

राधाबाई शिंदे हिला बाबांनी एकदा स्वतः करिता जेवण तयार करायला सांगितले. शिंदे बाईंना खूप आनंद झाला. त्या माऊलीने अगदी गडबडीत घरी जाऊन बाबांसाठी जेवण तयार करून आणले. श्रीबाबांनी आणलेले जेवण, समोरच असलेल्या कुत्र्याला घातले. तेव्हां राधाबाईस बाबांचा खूप राग आला. त्यावर श्री बाबा राधाबाईस म्हणाले, आये जो आत्मा माझ्या शरिरात वास करतो तोच आत्मा ह्या कुत्र्याच्या शरीरात आहे हे ज्ञान तू नीट समजावून घे म्हणजे आध्यात्म्याची गोडी लागेल. नव्हे तर तू आध्यात्म प्राप्त करून घेशील या जन्मीच काय परंतु प्रत्येक जन्मात तू सुखी होशील. श्री बाबा म्हणतात जन्म मृत्युच्या त्या रहाटगाडग्यातून जर कुणाला सुटका करून घ्याव-याची असेल तर त्याने आत्मज्ञान करून घ्यायला हवे. कुणाच्याही जन्माचे त्यामुळे सार्थक होईल. निरिच्छ होऊन तुम्ही परमेश्वराचे चिंतन करायला हवे. आत्म्यावर आपले मन केन्द्रित करायला हवे. आपल्या आत्म्याला विचार करायला लावा म्हणजे आध्यात्म प्राप्त होईल. तुम्हांला तसे करता येत नसेल तर या माझ्या मानवी देहावर मन केन्द्रित करा. असे केल्याने आत्मविचार आणि आध्यात्म अशा दोन्ही अवस्था प्राप्त होतील तुम्ही नवीन जन्म घ्याल आणि या युगात धन्यता पावाल.

मी कोण आहे? आलो कोठून? आणि जायाचे कोठे? हा देह नाशिवंत आहे पंचप्राणवायूत मिसळून जाईल. पण गेलेली वेळ पुन्हां येणार नाहीं. मी तुम्हांला आज येथे दिसतो उद्या दुसरीकडे निघून जाईन माया महा भयंकर चेटकी आहे. मायेच्या शृंखला मला सुद्धा बंधनकारक आहेत. या जन्मात काहीतरी सत्कृत्य करा माझ्यापासून थोडेतरी आध्यात्मिक ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करा. अल्ला तुमचे भले करील आणि तुम्हाला सद्‌गती देईल.

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात एकाद वेळी असा प्रसंग येतो की, त्याला आपला जीव नकोसा होतो. मन आत्मा यांची समतोल बुद्धि नष्ट होते. आणि वैराग्य उत्पन्न होते. बाळाराम मानकर यांची अशीच स्थिती झाली. आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून शिरडीला आले. त्यांच्या आयुष्याला योग्य वळण देण्याकरिता स्तुत्य उद्देशाने बाबांनी बारा रुपये दिले. आणि त्यांना मच्छिंद्र-गडावर जाण्यास सांगितले. परंतु मानकर कबूल होईनात. तेव्हां श्री बाबांनी आध्यात्म विचारांचा उद्देश्य पटवून दिला. बाबांच्या आज्ञेप्रमाणे मानकर गडावर ध्यान धारणा करीत बसले. भक्तांना समाधिस्थितीत त्यांच्या गुरुचे किंवा

देवतेचे दर्शन घडते, पण मानकरांना समाधिपूर्वीच्या जागृत स्थितीतच थोड्याच दिवसात बाबांचे प्रत्यक्ष सदेह दर्शन घडले. मानकरांनी श्री बाबांना विचारले तुम्ही गडावर का पाठविले? त्यावर बाबा त्यांना म्हणाले, "तुला शिरडीच्या गोंधळात भडकलेले डोके एकाग्रता पावणे कठीण होते. आता तू आत्मविचार कर आणि आध्यात्म प्राप्त कर. तू धन्य होशील". इतके सांगून साई अदृश्य झाले.

भगवान गौतमबुद्ध हे अडीच हजार वर्षापूर्वी होऊन गेले. त्यांनीसुद्धा आत्मविचार आणि त्यापासून आध्यात्म यांची जगाला शिकवणूक दिली. बुद्ध म्हणतात देह आहे म्हणून दुःख आहे जन्म हा प्रवृत्तीतून निर्माण होतो. प्रवृत्ती ही राग, द्वेष, मोह यातून निर्माण होते आणि हे सारे विकार अज्ञानातून निर्माण होतात या अज्ञानाचा नाश करा आणि आत्मविचार वाढवा म्हणजे सर्व दुःखे नाश पावतील.

आज विज्ञानाने पण श्री साईबाबांची आणि भगवान बुद्धांची सत्य शोधनाची प्रेरणा मान्य केली आहे.

**सदैव भक्ति लाभो ही माझी आस**<br>
**जन्मोजन्मी होईन मी तुझा दास**<br>
**अखंड लाभो मजला तुझा सहवास**<br>
**साईनाथा कर तू हृदयी मम वास**<br>
**जयदेव जयदेव जय साईनाथा – श्री साईनाथा.**

# बाबांमुळेच उत्सव साजरा

*********************

—सौ. वर्षा विलास ढगे. बी. ए., डी. एड.
'ओम् योगिनी', ८—३२ सोमवार बाजार
रोड, मालाड (प.) मुंबई— ४०० ०६४.

॥ जो जो, मज भजे जैशा जैशा भावे
तैसा तैसा पावे, मीही त्यासी ॥

० श्री साईबाबांचा उत्सव' माझे वडील श्री. शांताराम अनंतराव किरावंत हे पूर्वीपासून करतात. बाबांची नवरात्रात सप्तमीला स्थापना करतात व एकादशीला उत्सव समाप्ती होते. या प्रसंगी बाबांच्या पोथीतील चमत्काराचे एक—एक दृश्य ते चलचित्रांच्या सहाय्याने दाखवितात. आम्ही प्रथम २ री फणसवाडी येथे रहात होतो. बाबांची सकाळी आरती होत असे. रात्री शेजारती तर अतिशय रंगत असे. सर्व शेजारची मंडळीही मोठ्या भक्तिभावाने येत.

१९५४ सालची माझ्या जन्माची गोष्ट! माझ्या आईची प्रकृती अतिशय चिंताजनक! चौपाटी येथील कै. श्री. पुरंदरे डॉ. नी सांगितले की कदाचित दोन्ही केस गमवाव्या लागतील. दिवस ऐन उत्सवाचे! माझी आजी वडिलांस म्हणाली, "अरे, आपली चाळीची ही १ खोली, घरात ही गडबड तर तू बाबांना विनंती कर व भजन, शेजारती थोडक्यात आटप."। पण वडिलांची बाबांवर अगाध श्रद्धा! त्यांनी तिचे ऐकलेच नाही व बाबांना सांगितले की, माझ्या दोन्ही केस वाचल्या तर मी उत्सव दरसाल असाच चालू ठेवीन अन्यथा तुमची मर्जी!" दिवस होता ९ ऑक्टो. १९५४ चा. झाले इकडे आईला हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले आणि काय आश्चर्य साईकृपेने बाळ—बाळंतीण दोन्हीही सुखरूप! अजूनही माझे वडील बाबांचा उत्सव साजरा करतात.

अशी ही साईकृपा जन्मापासूनच मला लाभली केवढे हे भाग्य! बाबांचा प्रसाद म्हणून माझे नाव प्रसादिनी ठेवले. मला साईभक्तीचे जणू बाळकडूच मिळाले होते. बाबाच आम्हांला वेळोवेळी धावत येऊन या भवसागरातून

तरण्यास सहाय्य करतात. माझा विवाह श्री. विलास लक्ष्मण ढगे यांच्याशी झाला. आश्चर्य म्हणजे माझे पतीही साईभक्त असून दरवर्षी दोनदा आम्ही शिरडीस जातो.

प्रत्यक्ष ईश्वरालासुद्धा मानवी अवतार धारण केल्यावर जीवनसंकटांना तोंड द्यावे लागते! तर आम्हां मानवांची काय गोष्ट! पण आम्ही जीवनातील छोट्याशा संकटानेही डगमगतो व आर्ततेने आमच्या साईमाऊलीला' साद घालतो. माऊलीही सत्वर धावत येऊन जीवन सुखकर करते असे कितीतरी प्रसंग आहेत. साईमाऊलीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आपल्या भक्ताला भेटीसाठी ती जणू अनेक दृष्टांत देऊन शिरडीस बोलावत असते. खरे पाहिले तर माऊली सर्वत्र आहे. पण तिच्या समाधीची पायरी चढल्याने प्राप्त होणारा आगळा दिव्यानंद शब्दात अवर्णनीयच!

बाबांच्या कृपेनेच आमचे जीवन सुरळीत चालले आहे. 'श्री साईलीला' मासिक आम्ही गेल्या मे पासून सुरू केले. त्यातील इतरांचे अनुभव वाचून मन प्रसन्न होते. मी सध्या बी. एम. सी. च्या शाळेत शिक्षिका आहे. मधंतरी माझी बदली झाली होती. माझी प्रकृती प्रथम पासूनच नाजूक व दोन्ही मुले लहान घरी सांभाळावयास कोणी नाहीं अशा प्रसंगी लांबच्या शाळेत जायचे म्हणजे स्त्री ला नानातऱ्हेचे प्रश्न भेडसावतात. मी बाबांना सांगितले की, माझी बदली रद्द होऊ दे. आणि काय आश्चर्य! माझी बदली रद्द झाली मी माझा हा अनुभव आज लिहिन, उद्या लिहिन अशी टाळाटाळ माझ्या हातून झाली आणि लिहायचे राहूनच गेले पण माझे मन मला खातच राहिले. पण आज मला थंडी भरून ताप आला असतानाच बाबा कानी लागून म्हणाले की, "अग ऊठ तू अनुभव लिहितेस ना?" आणि मी लिहावयास बसले.

बाबा मी लावलेल्या विलंबाबद्दल तुम्ही माझ्यावर रागावू नका हं! तुमच्या आशीर्वादाचा हात सदैव आमच्या माथी असू द्या.

सकल मानवांची स्वार्थी वृत्ती नष्ट होऊन जीवन सुखकर होण्यास बाबा तुमच्या आशिर्वादाचा हात सकलजनांच्या पाठीशी असू द्या. हीच साईचरणी मनोमन प्रार्थना.

माझ्या बाबांना माझे कोटी–कोटी प्रणाम!

**॥ ओम् श्री साई, श्री साई माऊली**
**करी आम्हांवर कृपा साऊली, गे कृपा साऊली ॥**

# बाबांचा मंत्र : श्रद्धा–सबुरी

–श्री. गणेश शांताराम बडगुजर.
'साईप्रसाद' पवना नगर,
एस्. टी. कॉलनी मागे,
सांगवीगाव, पुणे २७.

॰ भक्ती!' किती गोड शब्द! किती सुंदर शब्द! केवढी मोठी जादू आहे या शब्दात! खऱ्या अर्थाने जीवन जगायला शिकविणारी प्रभावी शक्ती आहे. भक्ती नावातच सर्व परमेश्वरी 'शक्ती' सामावलेली आहे. परमार्थ साधण्यासाठी ज्ञान योगादि मार्गापेक्षा भक्तीमार्ग हा अत्यंत सोपा व सरळ मार्ग आहे. भक्ती म्हणजे जीवन सुखमय करण्याचा मार्ग.

श्री साईबाबांनी दिलेला खरा भक्तीमार्ग व भक्तीचा खरा मूलमंत्र श्रद्धा–सबुरी' या दोन शब्दातच सामावलेला आहे. परमेश्वरावर नितांत श्रद्धा ठेवा. परमेश्वराची भक्ती श्रद्धेने करा आणि तुम्हांला त्याचे फळ चांगलेच मिळणार: त्यासाठी लगेच फळाची अपेक्षा करू नका. सबुरीने फळाची अपेक्षा करा. म्हणतात ना गम बडी चीज होती है'! श्रद्धा–सबुरी' ने जीवनाचा मार्ग सोपा होईल. जीवन सुख–दु:खाने भरलेले आहे. जीवनात येणाऱ्या वादळ–वाऱ्याला, दु:खाला टाळण्यासाठी, त्यावर मात करण्यासाठी भक्ती' (ईश्वर नामस्मरण, ईश्वर गुण–गान भजन) हा एकच मार्ग सोपा व सरळ आहे. दु:ख आले तर डगमगू नका. वाटेवरील काटे वेचित जाण्याची सवय लावा. आपले मन मोहून टाकणारे सुंदर, गोड सुवासिक गुलाबाचे फुल हाती येण्यासाठी हाताला काटे आधी टोचवून घ्यावेच लागतात. किंबहुना हे सांगण्यासाठीच परमेश्वराने गुलाबाच्या फुलाची निर्मिती काट्यातूनच केली आहे. भक्ती शब्दाची महति–महिमा गाताना श्री साईध्यान यात कवीने खूपच सुंदर वर्णन केलेले आहे.

**धरितां साई ध्यान । आनंदे तृप्ते मन ।**
**करिता साई भजन । शांती मिळे सर्वथा ।।**
**खोटी ह्या जगाची माया । विसरले हरिसी भजाया ।**

गेला गेला जन्म वाया । नरदेही येऊनी ।।
ईश्वरासी भजला ध्रुवबाळ । मिळविले स्थान अढळ ।
पावला ईश्वरी बळ । भक्तीमार्गे जाऊनी ।।
भक्ती करी वाल्याभिल्ल । किती भक्षिले प्राणिमात्र ।
जाहला ऋषि पवित्र । भक्ती वाटे जाऊनी ।।
एका हो भक्त प्रल्हादा लागला ईश्वरी नाद ।
देऊनी जन्म त्यास माता धन्य जाहली ।।
आता नको पुरावे । श्री साईनाथा स्मरावे ।
चरण त्यांचे धरावे । श्री परमेश्वर मानूनी ।।

बाबांनी भक्तांना भक्ती मार्ग हा ईश्वर प्राप्तीचा मार्ग आहे. अशी शिकवण दिली. परमेश्वराचे अस्तित्व सर्व प्राणी मात्रात आहे. चरा–चर सृष्टीत परमेश्वर भरून राहिलेला आहे. त्या परमेश्वरा पुढे नतमस्तक केलेले त्याच्या चरणाशी राहिलेले चांगलेच. तुम्ही अनाथ व्हा. तुमची जीवनसूत्रे परमेश्वराकडे सोपवा. सुख, दुःख यांचे मिश्रण जीवन असते. तुमचे जीवन आनंदमय, सुखमय होण्यासाठी भक्ती, श्रद्धा–सबुरी खरा माग आहे. पुष्कळ लोक स्वतःला नास्तिक म्हणविणारे संकट समय येताच डगमगतात. परमेश्वरा-पुढे हात जोडतात. त्याला शरण जातात. म्हणजेच परमेश्वर सर्वश्रेष्ठ आहे. त्याच्या नामात लीन व्हा. त्यातच आपले भले आहे. आज ना उद्या ह्या देहाची राखरांगोळी होणार. जीवन हे नश्वर असते. म्हणजे जीवन आहे तोवर सत्कृत्य करावे. आध्यात्मिक ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करावा. त्यातच तुम्हांला सुख मिळेल. तुम्ही त्यातून सुखी व्हाल. तुमचे सुख पाहून परमेश्वराला देखील समाधान वाटेल. अशी मोलाची शिकवण साईबाबांनी दिली म्हणूनच बाबा म्हणतात.

जर तुम्ही मजकडे पहाल
तर मी तुमच्याकडे पाहिन

बाबांच्या समाधीचे दर्शन घेता, बाबांची उदी प्राशन करता, बाबांचे फक्त नाव घेता तुमची कठीण कठीण कार्ये सुद्धा सोपी होतात. दुःखे दूर होतात. नुसते बाबांचे श्रीमुख पाहून धन्यता वाटते. माणसाला आनंद मिळतो. सुख–समाधान मिळते. जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते.

साईबाबांनी त्यांच्या जीवनात नानाविध चमत्कार दाखविले. पाण्याने पणत्या पेटविल्या, हरविलेली घोडी दाखविली, चिलीम पेटविण्यासाठी चिमटा दगडावर आपटून विस्तव उत्पन्न केला. उदी देऊन गोर–गरीब, दीन–दुबळ्यांचे दु:खीतांचे जीवन आनंदी केले. स्वत: डोक्याला चिंधी, अंगात कफनी, हाती करवंटी या वेषात ते जीवन जगले. साईबाबा साक्षात् अवतारी पुरुष होते. साईबाबा महान संत होते. साईबाबा परमेश्वर होते. साईबाबा साक्षात् परब्रम्ह होते. परमेश्वर हा एकच असतो. त्यांची नावे, रूपे अलग–अलग असतात. परमेश्वराजवळ जातीभेद, धर्मभेद नसतो हे सांगण्यासाठी, दाखविण्यासाठी बाबांचा अवतार शिर्डीत झाला होता. कारण ते हिंदू की मुसलमान हे शेवट-पर्यंत कुणालाही समजू शकले नाही. मशिदीत दिवे लावणाऱ्या व देवळात नमाज पडणाऱ्या या देवाला म्हणावे तरी काय? शेवटी परमेश्वर एकच असतो. बाबांच्या भक्तात सर्वधर्मीय लोक आढळून येतात त्यात गरीब–श्रीमंत लहान–थोर असा कुठलाही भेदभाव दिसून येत नाहीं.

बाबांनी हा देह टाकून जातांना भक्तांना सांगितले की,

**जरी हे शरीर गेलो मी टाकून ।**
**तरी मी धावेन भक्तांसाठी ।।**

आणि खरोखरच बाबांच्या वचनाप्रमाणे आजही भक्तांना नानाविध चमत्कार दिसून येतात. शिर्डीला दररोज हजारो भक्तांची दर्शनाला रीघ लागलेली असते. शिरडीची वारी भक्त यासाठीच करतात की,

**शिर्डीस ज्याचे लागतील पाय ।**
**टळतील अपाय सर्व त्याचे ।।**

नुसते शिरडीस पाय लागल्याने, बाबांचे दर्शन घेतल्याने माणसाला आनंद मिळतो, त्यांची दु:खे कमी होतात अशा त्या महान भक्तीमार्ग देणाऱ्या श्री साईबाबांना कोटी प्रणाम!

**पहिल नमन परब्रम्हाला । गुरुमूर्ती साई देवाला ।।**

88 88 88

# मुलीचे पोट दुखणे थांबले

—सौ. रा. नं. सावंत.
१५३१ सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ३०.

० माझ्या मिस्टरांची साईबाबांवर अत्यंत श्रद्धा आहे. न चुकता साईंची पूजाअर्चा त्यांच्याकडून होते. दर गुरुवारी ते पुण्यातल्या साईंच्या मंदिरात आरतीच्या वेळी जातात. कधी काही अडचण असेल तेव्हांच मग आरती चुकते. मी त्यांच्याबरोबर देवळात जायचे. त्यांच्या इतकी श्रद्धा माझ्याठायी नव्हती. मी परमेश्वर मानते. पण विशिष्ट मूर्तीत विशिष्ट देव समजून पूजा करावी असे मला कधी वाटत नव्हते. परंतु माणसाच्या आयुष्यात अशा काही घटना घडतात की मग श्रद्धा ठेवावीच लागते. साईबाबा आज तुमच्या पुढे मी अत्यंत लीन आहे.

माझी लहान मुलगी ४ वर्षाची आहे. तिच्या २–३ महिने सतत पोटात दुखायचे. डॉक्टरकडे जावून प्रत्येक वेळी औषधे बदलूनही काही गुण येईना. केव्हां केव्हां रात्री बेरात्री सुद्धा पोटात दुखायला लागायचे मग अगदी काळ-जीने जीव उडून जायचा. कुठच्याच औषधाचा गुण येईना. काय होते तेही समजेना. शेवटी आम्ही ठरवल की एखाद्या लहान मुलांच्या तज्ञ डॉक्टरकडून सर्व तपासण्या करून घ्यायच्या. मी एक दिवस डॉक्टरकडे गेले. नेमके त्या दिवशी डॉक्टर नव्हते.

आमच्याकडे जानेवारी ८४ पासून साईलीला' मासिक सुरु केले. मे १९८४ चा उदी विशेषांक नेमका हाती आला होता त्यात खूप जणांचे साईंची उदी' ही किती विलक्षण गुणकारी आहे याचा अनुभव प्रत्येकाच्या लिखाणातून मी वाचत होते. मलाही एक दिवस वाटले की आपणही जर साईबाबांना असं म्हटलं तर . . .

साईबाबा माझ्या मुलीला तुमच्या उदीने बरे वाटू दे. या महिन्याच्या आत जर तिला बरे वाटले तर हा माझा अनुभव मी साईलीला' मासिकात पाठवेन असं म्हणून मी तिला उदी खायला दिली व तिच्या पोटालाही ३,४

दिवस लावली. त्यादिवशी ती छान झोपली. पोट दुखायचेही हळू हळू कमी व्हायला लागले. आता एखादवेळीच ती म्हणते पोट दुखतेय. पण तेही साईं-च्या कृपेने संपूर्ण बरे होईल याची मला खात्री आहे. माझ्या दोनही मुलींना उदी जीभेवर ठेवून खायला आवडते. त्यांचे बाबा तर साईबाबांना नमस्कार केल्याशिवाय व उदी लावल्याशिवाय ऑफिसमध्ये जात नाहीत.

साईनाथा तुझ्या लीला अगाध आहेत. ही श्रद्धा अशीच दिवसेंदिवस दृढतर होवो. दुःख संकटे निवारण करणाऱ्या साईनाथा तुझी कृपादृष्टी अशीच राहू दे.

# साई संदेश

—श्री. अरविंद बारटक्के
१३५, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

० थोर संतांची वचने आणि त्यांचे जीवन समाजाला चीरकाल आदर्शभूत ठरले! संत वाङ्मयामुळे समाज दुबळा न बनता संस्कारक्षम बनून चारित्र-संपन्न बनण्यास मदत होते. आजच्या विज्ञान युगात अंधश्रद्ध असू नये हे खरे परंतु त्याचबरोबर खऱ्या श्रद्धेची अवहेलना करण्यापेक्षा मांगल्यावर, चांगल्या मूल्यांवर श्रद्धा ठेवून सश्रद्ध असणे निश्चितच चांगले!

माणसाच्या सत्‌सद्‌विवेक बुद्धीला तजेला आणण्याचे व त्याला जीवनात शांती आणि सौख्य देण्याचा प्रयत्न खरा संतपुरुष करीत असतो. मानवी जीवन अस्थिर व विवेकशून्य बनत असेल व दिशाहीन समाजाचे तारू जर समाज विघटक, संहारक कृत्याने भरकटत असेल तर अशा वेळी संत त्या समाजाच्या नौकेस सावरतात. तिची जडणघडण बदलण्याचा आपल्या जीवनाने, कृतीने, यत्न करीत असतात आणि जास्तीत जास्त समाज, मानव कसा सुधारेल, त्याला शांती, सौख्य, समाधान कसे लाभेल, प्रेम बंधुभाव वाढीस कसा लागेल याकडे आपले सर्वस्व केंद्रित करीत असतात म्हणूनच त्यांचे जीवन मानवाला एक नवी दिशा प्राप्त करून देते.

संत शिरोमणी साईबाबांचे जीवन हा देखिल आदर्शभूत ठरावा असाच दाखला आहे. साईबाबा हिंदू होते की मुस्लीम हे ज्ञात नाही. ते माणूस म्हणून जगले व इतरांनी माणसात राहून मानवासारखेच जगावे असा उपदेश केला. साईबाबांकडे जातीभेद, वर्णभेद नव्हता, हिंदू आणि मुस्लीम दोन्ही साईंचे भक्त होते व आजही आहेत. जाती–जाती, धर्मावरून आज केवढे अराजक माजते आहे व त्याचे किती अनिष्ट, दूरगामी परिणाम होत आहेत हे आज आपणास दिसते आहे. हिंदू, मुस्लीम, शीख प्रत्येकजण आपापल्या जातीचा प्रचंड अभिमान बाळगून माणूसकी पायदळी तुडवत आहेत. अशा वेळी संतांच्या – साईबाबांच्या जीवनाची प्रकर्षाने जाणीव होते. साईबाबा मशिदित राहिले, त्यांनी रामनवमीचा उत्सव सुरू केला उरूसही होवू लागला. रामनवमी व उरूस या सणात हिंदू मुस्लीम एकभावनेने – एक दिलाने भाग घेवू लागले हे केवढे लक्षणीय! साईच्यापाशी हिंदू मुस्लीम ख्रिस्त पारशी शीख असा भेदाभेद नव्हता म्हणूनच सारेचजण साईच्या प्रेमाचे चाहते होते व त्या साऱ्यानाच साईप्रेमाचा लाभ झाला.

हे सर्व पाहिल्यावर वाटते की आपण कोण आहोत? हिंदू की मुस्लीम? हे साईबाबांनी न सांगण्यात त्यांचा सारे मानव एक आहेत व त्यांचा एकच धर्म आहे तो म्हणज माणूस हाच संदेश तर नसावा? आजही साईमंदिरात सर्व धर्मियांना प्रवेश मुक्त आहे. साईचरणी येवून हिंदू प्रार्थना, पूजा करतात. मुसलमान नमाज, कलमा पढतात हे केवढे वैशिष्टयपूर्ण आहे! इथे शीख, ख्रिस्त, पारशी, सिंधी सारेच येतात. साई मंदिरात येणारा प्रत्येक साईभक्त आपला धर्म बाहेर ठेवून आत येत असतो. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिस्ती सारेच जण एक होवून साईची प्रार्थना करतात. श्रद्धापूर्वक नतमस्तक होतात अशावेळी त्यांचा धर्म त्यांच्या आड येत नाही. सारे माणूस म्हणून एक होतात. एकतेचा हा संदेशच जणू यातून प्रतीत होताना दिसून येतो.

प्रत्येकाने आपापल्या धर्मानुसार आचरण करावे परंतु इतरांना त्याचा उपद्रव होवू न देता भारत हे निधर्मी राष्ट्र आहे असे आज ओरडून सांगावे लागते पण साईबाबांनी शतकापूर्वीच आपल्या कृतीने, आचरणाने ते दाखवून दिले होते. निस्पृहता, निधर्मीयता त्यांच्या जीवनाचे अविभाज्य घटक बनले होते. त्यांचा हा संदेश आजही समाजास जागृती आणणारा आहे. एक नवी दिशा, मार्ग दाखविणारा आहे हे निश्चितच अशा या साईचे श्रद्धापूर्वक पूजन करणे, भक्ती करणे म्हणजे मांगल्याचे, सौख्याचे पूजन आहे. एकतेचे अंगिकरण आहे. अशा या आपल्या सकलांच्या साईस माझे कोटी कोटी नमस्कार!

# बाबांची कृपादृष्टी

–सौ. सुहास अजित नाईक.
विठ्ठल मंदिरा समोर, गणेश चौक,
मु. पो. हरदा, जि. होशंगाबाद.

"शरण मज आला, आणि वाया गेला ।।
दाखवा दाखवा ऐसा कोणी ।।
नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य ।।
नित्य घ्या प्रचिती अनुभते ।।

० माझा भक्त जो दृढ श्रद्धेने मजवर पूर्ण विश्वास ठेऊन माझ्या शरण आला आहे. त्याला मी कृतांताच्या दाढेतूनही ओढून काढीन". गुरुमाऊलीच्या ह्या वचनाची प्रचिती मला नुकतीच आली.

सुखदुःख दोन्ही मानवी आयुष्यात असतात. सुखात मात्र मनुष्य अती आनंदात असतो दुःखानी मात्र होरपळून निघतो. माझ्या आयुष्यात असेच चटके लावणारे दोन प्रसंग आले.

माझे सासरे अनन्य साईभक्त आमच्या घरातील प्रत्येक नवीन काम बाबांच्या कृपे शिवाय होतच नाहीं. माझी सुद्धा बाबांवर पूर्ण श्रद्धा आहे.

तीन वर्षापूर्वी मी बरीच भाजली होती. त्या आजारातून बाबांच्या कृपेने लवकर बरी झाली. माणसाचे भोग मात्र त्यालाच सहन करावे लागतात. पण, माऊलीच्या नामस्मरणानी सहन करायची शक्ती येते, व दुःख कमी होते माझे सासरे मला नेहमी असे धीर द्यायचे. जणू बाबाच मला त्यांच्या मुखे आधार द्यायचे.

अलिकडचाच एक प्रसंग देत आहे. मला पाच वर्षाची जुळी मुले (भरत व भूषण) आहेत. २० ऑगस्टला रात्री ९ वाजेपर्यंत भूषण बरा होता. नंतर त्याला थंडी वाजली, वांती झाली, त्याला ताप चढत होता. बघता बघता त्याच्या छातीत वाजायला लागले. त्याने डोळे फिरविले. मान टाकली, व

निपचितच होऊन गेला. मी खूपच घाबरले. बाबांच्या नावाचा धावा केला, बाबा त्याला बरं वाटू दे. त्याच्या अंगाला ऊदी लावली. माझे सासरे बाबांकडे बसले त्याला मी सासूबाईंकडे दिले. त्यांनी भराभर त्याच्या अंगावर पाणी टाकल व जबरदस्ती तोंडात उदीच पाणी घातल. शेजारी माझी आजी राहते सर्वजण धावत आले. त्याच दिवशी शरदमामा तिथे आला होता. तो इंदौरला असतो त्यांनी त्याला घेतल व उदीच्या पाण्याच्या पट्टया ठेवल्या. मला वाटल आता आपल्याला काय पहायला मिळत आहे?

खरी प्रार्थना कधीच वाया जात नाहीं म्हणतात तेच खरे झाले. मी सारखी बाबांच्या नावाचा जप करत होते. बऱ्याच वेळांनी तो थोडा कण्हला. बाबांनी त्याला वाचवल. नंतर डॉक्टर आले व त्यांनी ताप बघीतला तर १०७ डिग्री होता. त्यांनी इंजेक्शन लावले व म्हणाले, "ह्याला जास्त औषध देऊ शकत नाहीं डोळ्यावर व डोक्यावर परिणाम होऊ शकतो. देवावरच विश्वास ठेवा." मी सारखी त्याला उदी लावत होते त्याचे डोळे शून्यात होते तो कुणा-लाही ओळखत नव्हता. तापाने तो वेडेवाकडे बडबडू लागला. आम्ही सारखे बाबांच्या नावाचा जप करत होतो. सकाळी पाच वाजेपर्यंत ताप कमी झाला. "बाबांचे होते लक्ष, काळाला मिळाले नाहीं भक्ष".

माऊलीच्याच कृपेने त्याचा पुर्नजन्म झाला. त्या कृपेची परतफेड ह्या जन्मात तरी शक्य नाही बाबांची लीला अगाध आहे.

❋ ❋ ❋

# श्रीसाईसच्चरित वाचनानंतर

—श्री. शाम जुवळे
जनार्दन भवन, ९
छबिलदास रोड,
दादर (प.) मुंबई २८

० गुरुवार दि. ३१–५–८४ रोजी पहाटे ४ वाजता भगवान श्रीसाई-बाबांनी स्वप्नाद्वारे श्री साईसच्चरिताची पोथी गुलाबाचे एक लाल फुल त्याच्यावर ठेवून माझ्या हाती दिली व मला ती वाच म्हणून आज्ञा केली; गेल्या सात दिवसात मी ती वाचून समाप्ती केली. पोथी वाचल्यानंतर श्रीसाई-कृपेने मनात उद्‌भवलेले सद्‌विचार मी खाली शब्दांकित केले आहेत. श्रीसाई-लीलेच्या भाविक भक्तगणांसाठी त्यांचा सदुपयोग होईल असे वाटल्याने ते देत आहे.

(१) प्रत्येक भक्ताची दैनंदिन साधना ही केवळ मनःशांती लाभण्या-करिता केलेली असते; मनःशांतीच्या अभावी मन अस्थिर व अस्वस्थ होत असते, मनाच्या अशा प्रतिकूल अवस्थेत केलेली साधना फलदायी होण्याच्या ऐवजी बरेच वेळा विपरित परिणाम घडवून आणित असते; म्हणून सर्वप्रथम भक्ताने आपल्या मनाचे दैनंदिन व्यापार बारकाईने अभ्यासिले पाहिजेत; मनः-शांतीच्या आड येणारे प्रत्येक बारीकसारीक व्यापार हुडकून काढून ते सर्व मना वेगळे केले पाहिजेत; एकदा मन मोकळे झाले म्हणजे साधनेकरिता ते अनुकूल होत असते; शुद्ध मन अविरतपणे श्री साई–चरणाशी निगडीत रहाते.

(२) विवेक व वैराग्य या दोन नेत्राद्वारे "श्रीसाईसच्चरित" या पवित्र व पुण्यदायक पोथीचे पारायण केले असता भक्ताच्या दृष्टीला असे प्रतित होते की श्री साईबाबा हे आपले वैयक्तिक जीवन विश्वाशी समरस होऊन जगत होते; भक्तांनी आदर्श–जीवन कसे जगावे याचे ते एक प्रात्यक्षिक होते; मानवी–जीवन विश्व–जीवनाचा अविभाज्य असा एक घटक आहे; समुद्राची लाट फार वेळ स्वतंत्रपणे उभी राहू शकत नाही; समुद्राशी समरस

होण्यात तिचे कल्याण साठविलेले असते; तद्वतच मानवी–जीवन विश्व–जीवनाशी समरस झाले असता समृद्धी पावत असते.

(३) प्रत्येक कर्म ईश्वराची पूजा या नात्याने केले असता भक्त प्रत्येक कर्माच्यावेळी दक्ष रहाण्याची अति उपकारी सवय स्वतःच्या मनाला लावून घेत असतो. सर्वकाळ दक्ष राहिल्याने अनुचित कर्म भक्ताच्या हातून घडण्याची शक्यता बहुधा असत नाहीं. कर्म करीत असता अनायासे भक्ताला देव–पूजाही घडत असते. साहजीकच देव–पूजेचा आनंदही तो अशा वेळी उपभोगीत असतो; देव–पूजेत देव हा अग्रगण्य असल्यामुळे भक्त हा स्वतःला भाविक–पूजारी असे संबोधित असतो म्हणजेच कर्माचे कर्तेपण देवाला देवून भक्त कर्म–फला-पासून अलिप्त रहात असतो; कर्म-फलापासून अलिप्त राहिल्याने भक्ताचा अहंभाव कमजोर बनला जातो; अहंभावाच्या कमजोरीमुळे भक्ताची श्रद्धा सहजगत्या वाढीस लागलेली असते; वाढीस लागलेली श्रद्धा विश्व–बंधुत्वाला पोषक अशी बनली जाते. विश्व–बंधुत्व भक्ताला सबुरीची महान शिकवण देत असते: श्रद्धा व सबुरी अशी बाणवून केलेली भक्ताची पावन श्रीक्षेत्र शिरडीची यात्रा सफल होत असते.

जय भगवान श्रीसाई–राम.

# उदीचा एक असाही चमत्कार

–सौ. अपर्णा हेमचंद्र प्रधान.
३१६ सोमवार पेठ,
पुणे – ११.

**नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धि माझे ठायी**

० माझे वडील पहिल्यापासूनच साईभक्त आहेत. आमचे घरी दर गुरुवारी साईबाबांची आरती वगैरे नियमित होत असते. योगायोगाने माझ्या वडिलांना जावई म्हणजे माझे पति हे पण साईभक्त मिळाले. ह्याबद्दल आमच्या घरी सर्वांनाच आनंद झाला. श्री साईनाथांच्या कृपेचे व उदीचे अनेक अनुभव व प्रचिती आम्हास आलेली आहे.

हा अगदी अलिकडचाच साईबाबांच्या उदीचा अनुभव मी देत आहे. मला तीन मुली आहेत. तिसऱ्या खेपेस मी माझे संतती बंदची शस्त्रक्रिया करून घेतली आहे. परंतु नुकतीच अशी वेळ आली की परत दिवस गेले आहेत की काय असे वाटू लागले व डॉक्टरनेही प्राथमिक तपासणीत तसे सांगितले. त्यामुळे आम्ही दोघेही फार हवालदिल झालो. काय करावे काहींच सुचेना. अखेर आम्ही श्री साईबाबांचे पाय धरले व प्रार्थना केली की बाबा आम्हाला आता चौथे मूल नको. आहे त्यांचाच व्यवस्थित सांभाळ करा. यातून तुम्ही आमची सुटका करा.

आणि खरोखरच दोन महिन्यांनी बाबांनी माझी ह्या संकटातून व्यवस्थित सुटका केली. कुठचीही शस्त्रक्रिया करावी लागली नाही अगर कुठचाही वाईट प्रकार घडला नाही. त्या दिवशी आम्ही श्वास टाकला व बाबांची कृतज्ञतेने प्रार्थना केली.

ह्यासाठी मी रोज बाबांची उदी पाण्यातून घेत होते. बाबांच्या कृपेने व त्यांच्या उदीनेच माझे संकट टळले अशी आमची पूर्ण श्रद्धा आहे. म्हणूनच बाबांची वचने व त्यांच्या उदीचा चमत्कार कधीही फोल ठरणार नाहीं अशी आमची पूर्ण श्रद्धा आहे.

बाबांच्या उदीमुळे माझे संकट टळले. असाच बाबांच्या कृपेचा व त्यांच्या उदीचा संकटग्रस्तांना लाभ होवो हीच साईचरणी माझी प्रार्थना.

# श्रद्धेचे फल

—सौ. नीता नारायण काळुष्टे
बी।१२, श्रीओजस सोसायटी,
कोल डोंगरी अंधेरी.

अखिल जगताची रात्रंदिवस चालत असलेली धडामोड कोणत्या तरी अदृश्य शक्तिमुळे चालू आहे. एवढे खास. ही शक्ति दूसरी कोणतीही नसून त्या सर्व शक्तिमान परमेश्वराची इच्छा हीच होय. मानवी प्रयत्न सर्वबाजूंनी निष्फल ठरल्यावर मग आपोआपच आपल्या तोंडून उद्गार निघतात परमेश्वरा तूच आता चमत्कार करून माझ्या प्रयत्नात यश दे".

माझा मुलगा चि. मिलींद बारावी (१२ वी) परीक्षा पास झाला. परंतु त्याला अभियांत्रिकी शिक्षणाकरिता ज्या गुणांची अपेक्षा होती तेवढे गुण त्याला मिळाले नाहीत. माझ्या मुलाची अभियांत्रिकी कडे अधिक ओढ होती. त्याचप्रमाणे तो अभ्यासही करीत होता. परंतु त्याच्या अपेक्षेप्रमाणे गुण न मिळाल्यामुळे तो निराश झाला. आणि मी पण निराश झाले. तरी सुद्धा मिळालेल्या गुणांनी माझ्या मुलाने सरकारने नवीन काढलेल्या इंजिनिअरिंग आणि पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये बऱ्याच ठिकाणी अर्ज केले. प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणी जाऊन प्रवेशासाठी खटपट करीत होता. एक दोन महिने उलटून गेले तरी यश आले नाही.

अशा स्थितीत एकमेव आधार म्हणजे आमचे सद्गुरु साईबाबा. त्यांच्या–शिवाय आम्ही कोणाचा पदर धरणार ? आम्ही साईबाबांचा जप सुरू केला. व बाबांना साकडे घातले की, माझ्या मुलाला अभियांत्रिकी कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला पाहिजे. आणि सर्वस्वी बाबांच्यावर अवलंबून राहिलो.

आणि एके दिवशी अचानक एका पॉलिटेक्निक कॉलेजचे पत्र मिळाले, आणि माझ्या मुलाला मुलाखतीसाठी बोलावण आले. आम्ही त्याठिकाणी गेलो. फीचे पैसे भरून प्रवेश घेतला. पण त्याच ठिकाणी एक चमत्कार झाला. तेथे उपस्थित असलेले अनोळखी गृहस्थ आम्हाला म्हणाले की," तुमचा

मुलगा बारावी (१२वी) पास आहे व गुणांची टक्केवारी पण चांगली आहे. तर त्याला इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये का पाठवित नाही? पेणला नवीन कॉलेज उघडले आहे तेथे अशा हुशार मुलांना जरुर प्रवेश मिळेल. एवढे ऐकल्यावर बाबांचा धावा करीत करीत आम्ही पेणला आलो. सायंकाळची ५ ची वेळ. संस्थेचे अध्यक्ष भेटतील की नाही ही आणखीन चिंता. पण बाबांच्या कृपेने अध्यक्ष भेटले आणि त्यांनी सद्भावनेने गुणांची टक्केवारी तपासून इंजिनिअरींग कॉलेजमध्ये माझ्या मुलाला प्रवेश दिला.

साईबाबांची लीला अगाध आहे. ज्या गृहस्थांना आम्ही या घटनेपर्यंत पाहिले नव्हते. ते अचानक भेटतात काय व सल्ला देतात काय. सर्वच अघटित होते. जणू साईबाबांनीच त्यांना आमच्यासाठी पाठविले होते. साईबाबांनी चमत्कार करून माझी इच्छा पूर्ण केली.

"जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव" याची प्रचिती बाबांनी कळकळीची हाक मारताच मला आणून दिली. माझ्या तोंडून नकळत उद्‌गार निघाले "दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती."

❖ ❖ ❖

## जाहीर प्रकटन

श्री साईबाबा शिरडी यांना भक्तांनी अर्पण केलेल्या वस्त्रांची व विविध वस्तूंची विक्री दर गुरुवारी, रविवारी व उत्सवातील सर्व दिवशी सकाळी आठ वाजले पासून शिरडी येथील श्री साईबाबा मंदिराचे समोरील आवारात, जाहीर लिलावाने होईल, तरी ज्या साईभक्तांना अशी प्रसाद वस्त्रे व प्रसाद वस्तू घेणेच्या असतील त्यांनी लिलावाचे वेळी हजर राहून मागणी करावी व श्री साईबाबांचे प्रसादाचा लाभ घ्यावा.

—रा. द. बघे.
कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी.

# चालू युगात साईबाबांचे महत्व

—श्री. विजय यशवंत सहामते
मुक्काम पो. चिचणी,
तालुका डहाणू जिल्हा ठाणे.

इश्वर अल्ला तेरे नाम। सबको संमती दे भगवान॥

ह्या गाण्याच्या ओळीने आपणाला बरेचसे समाधान मिळते. परमेश्वर, रहिम, येशू आणि अल्ला सर्व काही एकच. आपण त्याला निरनिराळी रुपे देऊन प्रत्येक जण त्या त्या माध्यमातून आपला राम, रहिम सर्वकाही शोधीत असतो आणि त्याचा त्या त्या जगतमान परमेश्वरावर विश्वास असतो. परमेश्वराची रुपे ही जरी वेगवेगळी भासत असली तरी तो एकच आहे. ज्या प्रमाणे पाण्यात रंग टाकावा व तो रंग त्या पाण्यास येतो तद्वतच परमेश्वर त्याच्या निरनिराळ्या रुपांनी आपली परीक्षा घेत असतो त्यात आपल्या श्रद्धेची पातळी किती बरे भरते.

अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री. सच्चिदानंद सद्गुरु साईनाथांनी आपला अवतार ह्याच करिता घेतला असावा. त्यांनी आपणा सर्वांना जवळ आणले. आपल्यातील जात, पात इ.ची कीड त्यांनी धुऊन टाकली. आपण सर्व एक आहोत आणि अल्ला व ईश्वर एकच आहे. "अल्ला तेरा भला करेगा" ह्या बाबांच्या म्हणण्याने आम्ही आमच्यातील भेदभाव विसरुन बाबांच्याकडे जात होतो व जातो आणि त्याचेच प्रतीक म्हणजे सध्या शिरडीत सर्व–धर्म समभावाचे प्रतीक आपणास पहावयास मिळते.

बाबांनो तुम्ही एकाच परमेश्वराची लेकरं.' कोणाला काही देता आले नाही तर देऊ नका परंतु गोड बोलून सांगा. देवाने मौल्यवान मनुष्य जन्म दिला तो व्यर्थ मातीमोल का करता, माणसाने आप–आपसातील हेवेदावे विसरून एकत्र या. चांगले कार्य करा जेणे करुन मनुष्य जन्माचे सार्थक होईल. मला नेहमी आठवा. मी तुमच्या बरोबरच आहे. माझी घडे तुर्बती मधून सुद्धा तुम्हाला आवाज देतील. बाळांनो ह्या दयाच्या मंदिरात पंचप्राण आहेत तोपर्यंत दिवसातून एकवेळा तरी आपल्या आराध्य देवतेचे स्मरण करा.

करु करु म्हणता वेळ निघून जाईल. नग्न आलो नग्न जायचे. मी फकिर, मला घर ना दार, सारी किरकीर त्यागून मी मशीदींत (द्वारकामाईत) आलो. येथे कोणी कोणाचे नाही म्हणून संपत्तीचा गर्व ठेवू नका. गर्वाने फूलू नका. भूकेल्याला अन्न, अश्रीतांना क्षणभर निवारा द्या. परमेश्वर सदैव तुमचे कल्याण करील.

किती सुंदर व चांगले विचार या पिढीला बाबांनी दिले. परंतु आज नेमकी परिस्थिती उलट झाली. आम्ही आमच्या स्वकतृत्वाने मानलो. आमच्या—तील "माणूसकी" हा शब्द कागदावर लिहिण्यापुरताच राहिला. आम्ही आमच्या बंधुभगिनींचे रक्ताचे घोट घेऊ लागलो. कशाला मर्यादाच राहिली नाही. आम्ही गरिबांवर अनाथांवर घोर अन्याय करुन आमची घरे कशी सुखी करू ह्या विचारात आहोत. प्रेमाचा मायेचा ओलावा आमच्यातून लोप पावत असून त्याची जागा द्वेष आणि मत्सराने घेतली. आम्हीच शहाणे ठरलो. ऽऽऽ नाही' आम्ही जन्माला येऊन निरर्थक ठरलो म्हणायचे. आम्ही आमच्या जन्मदात्या आईबापांना विचारेनिशी झालो. फॅशनरुपी वादळात सर्वस्वी गमावून बसलो. अहंकाराने वैमनस्य ओढून घेतोय व मानसिक संतुलन घालवून बसतो. बाबांच्या वरील वचनांची घोर घोर निराशा केली. निसर्ग सुद्धा सुखाने जगू देईना. रोजच जाळ पोळ, दगली, खून, रक्तहानी ह्यांनी आमचा श्वास गुदमरतोय, त्यातच वाढत्या महागाईचा ब्रम्हराक्षस आऽऽ वासून उभा आहे. प्रलय, अपघात इ. आपत्तीद्वारे आमच्या दरिद्री जीवनाची लक्तरे होत आहेत.

अजूनही वेळ गेली नसावी. आपण सर्व बाबांना शरण आलो आणि प्रार्थना केली की, बाबा तूम्हा वीना आम्हा "कुणी दाता बाबा कुणी त्राता" बाबा आम्ही मुर्ख, अज्ञानी तुम्हाला शरण आलोय. तुमच्या वचनाप्रमाणे ह्या कलियुगात आमच्या सहाय्यासाठी याल का ? होय तुम्हाला आलेच पाहिजे. मुल चुकले तरी आई त्यास प्रेमळपणे पुन्हा कडेवर घेतेच की नाही. बाबा आम्ही चुकलो. तुमच्या वचनांचा वेगळाच अर्थ घेऊन कोष्टीकाप्रमाणे अविचाराचे जाळे तुमच्या शिवाय बाबा कोण बरे तोडणार. बाबा लवकरच पुन्हा अवतार घेऊन सध्या चाललेल्या भस्मासुररुपी अविचाराला मारण्याचे सामर्थ्य फक्त तुमच्यातच आहे. फक्त तुमच्यात. बाबा तुम्ही पुन्हा यालच, तुमच्या दर्शनाने, स्पर्शाने आम्ही सर्व काही भेदभाव जाती पंथ सगळे विसरुन तुमच्याच चरणी लीन होऊ, परंतु याल वरं का ?

एक मनोगत

# साईबाबांची भक्ती

-श्री. मुरलीधर घोलप
६५३ सहकार नगर नं. २,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

० शिरडीचे श्रीसाईबाबा हे कोणत्या धर्माचे, जातीचे, पंथाचे पाईक होते ही गोष्ट अज्ञात आहे. पण ते फकिरी वृत्तीचे वैरागी होते हे सर्वज्ञात आहे. गरीबांवर, प्राण्यांवर दया करा, दानधर्म ऐपतीप्रमाणे करा असे ते सांगत होते. निरिच्छ, दयाळू, परोपकारी स्वभाव असे वर्णन निरनिराळ्या ग्रंथात वाचले आहे. त्यांनी दाखवलेले चमत्कार, त्या योगे अनेकांना त्यांची पडलेली भुरळ सर्वज्ञात आहे. ठिक-ठिकाणी बाबांची मंदिरे आहेत. अवतारी पुरुष म्हणून व ज्यांना परमेश्वर समजला त्या बाबांना मानून त्यांची पूजा अर्चा करण्यास सगुण भक्तीचा मार्ग अवलंबिणाऱ्यांना जर चमत्कार पहावयाचा असेल तर त्यांनी बाबांची भक्ति जरूर करावी.

एक उदाहरण देतो. माझा एक भाचा आहे मुंबईत. तो तरुण आहे. बी. कॉम. झालेला आहे. पदवीधर आहे. त्याने माझे घरी बाबांची तसबीर बघितली. तसेच मी बाबांवर आधारीत केलेले काव्य-लेखन श्री साईलीलेत वाचले त्याने. मग बाबांची एक छोटीशी पोथी त्याने आणली. त्याला काय वाटले असेल ते असो पण आज तो साईभक्त झालाय हे मी स्वतः बघितले. मी तर त्याला काहीं सांगितले नव्हते की तू असे कर पण काहीं तरी बाबांचा त्याचेवर प्रभाव पडून तो साईमय झाला आहे. हा सुद्धा एक चमत्कारच आहे.

ईश्वराच्या अस्तित्वाचे दर्शन घडविणाऱ्या व पटविणाऱ्या सामान्य बुद्धिच्या पलिकडे पोचलेल्या साक्षात्कारी प्रतिभेचे व प्रतिमेचे देणे असलेल्या गूढ, अगम्य अनाकलनीय वृत्तिचे परोपकारी श्रीसाईबाबा हे संत महात्मे तर होतेच होते परंतु समाजाचा एक कल जो नास्तिकवादाकडे झुकत होता, तो कल वेळीच त्यांनी आपल्या अंगी असलेल्या दिव्य व अद्‌भूत शक्तिचे सामान्य जनांना दर्शन देवून सावरला. समाजाला योग्य वळण लावण्याचे लोकोत्तर कार्य अनेक

संतानी केले. इतर अनेक समाजधुरीणांणी सुद्धा केले, हातभार लावला, जन-जागृति केली पण हे संत, महात्मे व इतर समाजधुरीण एका विशिष्ट अशा जाती धर्म पंथाचे होते. पण बाबा कोठून आले व तेही अवचित आले व गेले कोठे हे गूढ मला तसे सुटले नाहीं. निरनिराळ्या जाती, धर्म पंथाचे लोक त्यांनी भक्त म्हणून आपल्यामागे आणले हे कशाचे द्योतक आहे? निरनिराळ्या जाती, धर्म पंथाचे लोक एका ठिकाणी खेचून आणणे व अखिल मानव धर्म हाच खरा धर्म व मानवतेची शिकवण देणे, तसे संस्कार त्यांचे मनावर करणे हे सोपे काम होते कां? शीलाखंडातून सुंदर शिल्प शिल्पकार निर्माण करतो. हे ज घडवणे आहे नेमके तेच कार्य बाबांनी केले. बाबांचे कार्य खरे तर थोरच आहे. त्यांची भक्ति करणे योग्यच आहे. परंतु जर काहीं आत्मशुद्धि हवी असेल मनाची शांती हवी असेल, आत्मविश्वास हवा असेल, प्रामाणिक व्हावेसे वाटत असेल, राग क्रोध मत्सर वगैरे दुर्गुणावर मात करावीशी वाटेल, सत्यवादी व मानवतावादी व्हावेसे वाटत असेल, तर फक्त एकच उपाय आहे. बाबांची शिकवण आचरणात आणणे मग मी म्हणजेच बाबा आणि बाबा म्हणजेच मी हे वेगळेपण गळून पडेल. मी आणि बाबा वेगळे नाहीं आहोत ही धारणा मनात जोपासते, वाढते, म्हणजेच मी व बाबा दोन नाहींत ही भावना मनात जोपासणे' दृढ करणे, ह्याचा अर्थ निर्गुण निराकार भक्ति होय असे मला वाटते.

श्रद्धेशिवाय माणूस जगूच शकत नाहीं. श्रद्धास्थाने वेगवेगळी असतील पण प्रत्येकाची कोणावर ना कोणावर श्रद्धा ही असतेच. पण फक्त श्रद्धा असण्यापेक्षा ज्यावर श्रद्धा ठेवली जाते, त्या श्रद्धास्थानाची शिकवण काय होती, आचरण कसे होते हे बहुतेकदा विसरले जाते. किंवा सोईस्करपणे त्याचा विसर पडतो. नुसती श्रद्धा ही अंधश्रद्धा होय. श्रद्धास्थानाची शिकवण काय होती आचरण काय होते हे मनोमन पक्के जाणून घेऊन तसे आचरणात आणणे म्हणजेच सत्वयुक्त भक्ति होय. तोंडाने नामाचा गजर करण्यापेक्षा जर अंतःकरणात सतत गजर जागता ठेवला तर अंतःकरणातून काहीं एक प्रेरणा निश्चित मिळू शकेल. हृदयातले ठोके जसे सतत चालू असतात त्यात खंड नसतो. तसेच प्रेरक शक्तिचा सतत गजर अंतःकरणात चालू हवा. मग जागेपणाची अवस्था असो वा निद्रित अवस्था असो.

"शोधू नकोस आता तू अन्यत्र माधवाला
हृदयी तुझ्याच आहे निरंतर तो वसतीला"

▲▲▲▲

# बाबांची उदी महान औषध

—कु. सुजाता शामसुंदर पालकर.
६, डहाणूकर बिल्डिंग,
कांदिवली (पश्चिम)
मुंबई – ४०० ०६७.

० आजपर्यंत आमच्या कुटुंबावर अनेक संकटे आली परंतु त्या संकटातून शिरडीच्या साईबाबांनी आम्हाला सुखरूपपण सोडवले आहे. असेच काही अनुभव मी या लेखाद्वारे आपल्या समोर मांडत आहे.

बाबांची उदी म्हणजे संजीवनी आहे. त्या उदीमुळे व बाबांच्या कृपाशिर्वादामुळे अनेक लहान मोठे आजार' रोग बरे होतात. नुकतेच माझे लग्न ठरले आहे. एकदा मिस्टरांच्या उजव्या डोळ्याच्या खालच्या पापणीच्या आतील बाजूस एक पुळी आली. आठ दिवस औषधोपचार करूनही त्या पुळीमुळे होणारा त्रास होतच होता. अखेरीस फॅमिली डॉक्टरांनी त्यांना डोळ्यांच्या स्पेशालिस्ट डॉक्टरांकडे जाण्याचा सल्ला दिला.

डोळ्यांच्या डॉक्टरकडे मिस्टरांना घेऊन गेले असता डॉक्टरने सांगितले की ही पुळी आता औषधोपचारानी बरी न होता तिचे ऑपरेशन करावे लागेल व ऑपरेशन शिवाय दुसरा पर्याय नाही असे सांगून डॉक्टरनी ऑपरेशनसाठी दिवस, वेळ ठरवून आम्हांस जाण्यास सांगितले. नाईलाजास्तव मिस्टर ऑपरेशनला तयार झाले. परंतु मी त्यांना धीर देऊन सांगितले की कुठलेही औषध घ्यायचे नाही आणि ऑपरेशनही करायचे नाही. मी बाबांना सांकडे घातले की ऑपरेशनशिवाय डोळा बरा झाला पाहिजे. मी रोज त्यांच्या डोळ्याला उदीचा लेप लावी व उदी खायला देई, आणि थोड्याच दिवसात ऑपरेशन न करता डोळा पूर्ण बरा झाला आता त्यांना कसलाही त्रास होत नाही.

तसेच एकदा मिस्टरांच्या मानेला व काखेत अचानक गाठी आल्या. सतत १५ दिवस औषधोपचार चालू होते, परंतु डॉक्टरना गाठी कसल्या आहेत ते समजू शकले नाहीं. शेवटी डॉक्टरांनी रक्त तपासण्यास सांगितले. मी तर खूप घाबरून गेले. ह्या वेळीही मी त्यांना काहीं दिवस उदी दिली व बाबांना विनवणी केली की रक्ताचा रिपोर्ट पूर्ण नॉर्मल असू दे, मी माझा अनुभव

साईलीला' मासिकात देईन, व त्याप्रमाणे रिपोर्ट खरोखरच पूर्ण नॉर्मल आला, व त्यांना बरे वाटले.

आणखीन काही दिवसांनी त्यांच्या पोटात दुखू लागले व जेवणही अजीर्ण होऊ लागले. खूप दिवस औषधे घेतली काहींच फरक पडत नव्हता. परत ह्या वेळेसही डॉक्टरांनी रक्त, लघवी तपासण्यास सांगितले, तेव्हांही मी त्यांना पाण्यातून उदी प्यायला द्यायची व त्यांना पोटाला लावायला सांगायची. बाबांच्या कृपेमुळे हा सुद्धा रिपोर्ट नॉर्मल आला व शेवटी त्यांना उदीनेच बरे वाटले.

बाबांच्या उदीचा दैवी चमत्कारच असा आहे. कुठल्याही औषधाने बरे न झालेले आजार बाबांच्या उदीने पूर्ण बरे होतात. फक्त आपण बाबांवर श्रद्धा ठेवली पाहिजे व सबुरीने काम केले पाहिजे. मग बाबा असे वागणाऱ्याच्या मनोकामना पूर्ण करतातच. भक्तांच्या हाकेला सदैव ओ देणाऱ्या माझ्या माऊलीला शतशः प्रणाम.

88 88 88

# साई चमत्कार

—सौ. अनघा अरुण बंगाळे.
४—९ जुनी एअर—इंडिया कॉलनी
सांताक्रुझ, कालिना (इस्ट).
मुंबई नं. — ४०० ०२९.

० साईलीला मासिकात अनुभव लिहिण्याची केव्हांपासून माझी इच्छा होती ती आज मी पूर्ण करीत आहे. खरं म्हणजे बाबांच्या कृपेनेच ती इच्छा पूर्ण होत आहे. पूर्वी मासिकात दुसऱ्यांचे अनुभव वाचून वाटायचं आपल्याला बाबा कधी पावतील का? आपली इच्छा बाबा पूर्ण करतील कां? आणि खरोखरच बाबांनी माझे हे गुपित जाणले असावे म्हणूनच मी आज माझा गोड अनुभव साईलीलामध्ये देऊ शकले.

माझ्या लग्नाला पाच वर्षे होत आली तरी आमच्या घरात पाळणा हालत नव्हता. खूप औषधोपचार केला. परंतु काही उपयोग होत नव्हता. डॉक्टरांनी सांगितल्याप्रमाणे फॉरेनहून औषधे मागविली (अर्थात माझे पती एअर इंडियात असल्यामुळ ही औषधे मिळविता आली) परंतु पदरी निराशाच येत होती. शेवटी गावठी औषध घेण्यास सुरुवात केली. त्यांनी तीन महिन्यात गुण येईल असे सांगितले. चार महिने झाले तरी काहीच चिन्हे दिसेनात शेवटी निराश होऊन औषध बंद करण्याचा विचार केला आणि त्याचवेळी बाबांच्या कृपेने माझ्या पतींची भेट वांद्रयाच्या साई दरबारातील जाधव मास्तरांशी झाली. सहज बोलता बोलता त्यांना कळले की आम्हांला मूल नाहीं. त्यांनी आम्हांला गुरुवारी साईदरबारात येण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही दुसऱ्याच गुरुवारी तेथे गेलो. तेथे बाबांची मूर्ती पाहून शिरडीची मूर्ती डोळया-समोर आली. आम्ही दोघे बाबांसमोर प्रार्थना करीत होतो. इतक्यात जाधव मास्तरांनी माझ्या ओटीत केळी घातली व आम्हांला आशिर्वाद दिला. त्यानंतर दर गुरुवारी आम्ही तेथे जाऊ लागलो, आणि काय आश्चर्य दोन महिन्यातच मला दिवस गेले व मला पुत्र प्राप्त झाला. आता माझा बाळ सात महिन्याचा झाला.

तसेच माझ्या पतींना रात्रपाळी असते तेव्हां मी एकटीच असते. सर्वजण विचारतात की एवढ्या लहान मुलाला घेऊन तू एकटीच रात्री कशी रहातेस? परंतु रात्री झोपताना मी माझ्या व बाळाच्या कपाळाला बाबांची उदी लावते व बाबांची प्रार्थना करीत झोपी जाते. त्यामुळे मला रात्री कधीच भिती वाटत नाही तसेच बाळसुद्धा रात्री शांत झोपतो. अशी आहे माझ्या बाबांची किमया अशी आहे त्यांच्या उदीची किमया.

अशा माझ्या बाबांना शतशः प्रणाम. तसेच बाबांची कृपादृष्टि सतत आमच्यावर राहो हीच बाबांच्या चरणी प्रार्थना.

# साई माझी माऊली

साई यावी तुझी आठवण ।
सकाळची थंड झुळूक होऊनी ॥

गावे तुझे गीत मदमस्त होऊनी ।
संगे तुझ्या असावे छाया तुझी होऊनी ॥

चरणी तुझ्या लागावे ।
तव पुष्प कमळ होऊनी ॥

गाऊ तुझे गुण किती ।
आहे माझी सिमित मूर्ती ॥

ये धावूनी माझ्या साईनाथा ।
माऊली तू माझी होऊनी ॥

पिता तू माझा सखा तू माझा ।
साई तू माझा साई तू माझा ॥

गाऊ तुझे गुण किती ।
साई बस तुझ्या चरणी हा माथा ॥

—श्री. टी. एन्. चव्हाण
योगीकृपा'
मातंगी को.-ऑ. हाऊसिंग सोसायटी,
वैशाली सिनेमा समोर
नडियाद ३८७ ००१ (गुजरात स्टेट)

# साईनाथांचा महीमा

छोटेसे आहे एक गाव
त्याचे शिर्डी असे नाव
त्याची आहे मोठी ख्याती
सर्व जातीचे तेथे जन येती ॥१॥

श्रद्धा, सबूरी मनी धरा ।
बाबा येती त्यांच्या घरा ।
समर्थ साई म्हणती लोक ।
मुखी म्हणा पुण्य श्लोक ॥२॥

बाबा सद्‌गुरु माझे साई ।
धाव पाव माझे आई ।
माझे बाबा सद्‌गुरु ।
आणि सर्वांचे कल्पतरू ॥३॥

माऊली आमची मातापिता ।
तसाच सर्व जगाचा त्राता ॥
दीनांचा आहे दीनबंधू ।
त्यांच्या पदकमली मी वंदू ॥४॥

साई मायाळू कृपाळू ।
तसाच दीनांचा दयाळू ॥
तशीच आहे उदीची महती
नाथाची महिमा गाऊ किती ॥५॥

—सौ· सुधा गानल
डॉ. आकुला वाडी,
१०, लक्ष्मीनारायण लेन,
माटुंगा १९.

# जा शरण साईला

श्रद्धा सबुरी तत्व प्रणाली साई वचन पाळा
जा शरण साईला जा शरणें साईला ॥धृ.॥

शरण आला वाया गेला ऐसा नाही कोणी
साईला तू भज रे मानवा काया वाचा मनी
चहुकडे हा उभाच साई जपा रे साईमाला ॥१॥

देह जरी हा टाकून गेलो उभा मी सर्वांपाठी
दर्शन देईन म्हण साई हा माझ्या भक्तांसाठी
'अल्ला सबका भला करेगा' स्मरा साई वचनाला ॥२॥

'सबका मालिक एक' रे बाबा सांगून गेले साई
उदीस भाळी लाव मानवा सांगे मशिदमाई

साईबाबा जो सकलांचा साईग्रंथ तो वाळा
जा शरण साईला जा शरण साईला ॥३॥

– लावणी सम्राज्ञी सौ. आसावरी वायकूळ
संगीत विशारद, इ ९१८ बर्वेनगर,
घाटकोपर (पश्चिम), मुंबई ४०० ०८४.



# साईबाबा–नाम महात्म्य

भज रे मना, साईबाबांचे नाम ।
भजता भजता नाम तयांचे, बनले सारे काम ।।
भज रे मना, साईबाबांचे नाम ।।धृ.।।

दीन दुबळ्यांचा तू कैवारी, गुणवंता साईराया ।
विश्व चालका कृपा सागरा, थोर तुझी रे माया ।।
साई माऊली रे अवतरली, धन्य शिरडी धाम ।।भज रे मना।।

दीन बन्धु रे दीनानाथा, शीतल तुझी छाया ।
भक्ताच्या रे संकटवेळी, धावत ये गुरु राया ।।
लोचनी वाहे अश्रुधारा, आठवता तव नाम ।।भज रे.

गाता गाता महिमा तुझा, धन्य जाहली वाणी ।
भक्त तुझे गुण गाता गाता, थकले नाही कोणी ।।
नयनी रसले हृदयी बसले, मधुर तुझे रे नाम ।। भज रे.

भाव भक्तिची ज्योत लावली, अश्रु फुलांच्या माळा ।
साई तुझिया चरणी आलो, मी बालक रे भोळा ।।
कृपा–सावली सदा असू दे, भगवंता साई राम ।।भज रे.

–श्री. भूरनदास बोरकर "सौरभ".
डी. बी. साइंस कालेज, पो. गोंदिया,
जि. भंडारा (महाराष्ट्र) ४४१ ६१४

# साईबाबांना ओवी

पहिली ओवी ग माझी समाधी मंदिरातील साईना
"श्रद्धा सबूरी" मंत्र स्पर्श होता त्यांच्या ओठांना ॥१॥

दुसरी ओवी ग माझी त्या लाडक्या द्वारकामाईला
जिथे साई राहिले होते वसतीस्थानाला ॥२॥

तिसरी ओवी ग माझी निंबवृक्ष गुरुस्थानाला
तिथे बसले हो बाबा बारावर्ष तपाला ॥३॥

चौथी ओवी ग माझी चावडीला
होते बाबा तिथे जन रक्षणाला ॥४॥

पांचवी ओवी ग माझी लेंडीबागेला
बुडाखी विहिरीतील निरेने त्यांनी पणत्या लाविल्या ॥५॥

सहावी ओवी ग माझी खंडोबा मंदिराला
चंपाषष्ठीला उतरले भक्त तिथे अग्नि परिक्षेला ॥६॥

सातवी ओवी ग माझी त्या शिर्डी क्षेत्राला
प्रगटले साईदेव तिथे दर्शन देण्याला ॥७॥

—सौ. वसुंधरा रामराव चोरे
८०३ सी, लक्ष्मी भुवन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

# अवतरला साई

धन्य क्षेत्री पुण्य नगरी
अवतरला श्रीसाई

दर्शन घेता तृप्त झालो
ही तर माझी आई ॥

दिव्य शिळेवर दिव्य ज्योत ही
उजळे नेत्री उजळे हृदयी

श्यामल कोमल फकीर होऊन
बैसली ग विठाई ॥१॥

दीनबंधू हा दीन होवून
कोठून आला शिरडी पावन

शांतीसुखाचे सागर निर्मून
अलख निरंजन गाई ॥२॥

महिमा थोर बाबा गुणांचा
दर्शन घेता नेत्री द्रवता

उदीत लपला सत्व गुणांचा
जो भक्तिरूप पाही ॥३॥

—श्री. अजित म. पावसकर.
जे १८।२ स. गो. बर्वे नगर,
घाटकोपर, मुंबई ४०० ०८४.

★ ★ ★

# प्रार्थना

साई श्री नमितो, तुम्हांसी स्तवितो
ध्यातो तुम्हां अंतरी ।
त्वद्‌भक्ति मज द्या, सुबुद्धि गुण द्या
प्रार्थी प्रभो श्रीहरी ।।
सद्‌धर्मी मति द्या, सुकिर्ती यश द्या
विघ्न हरुनी दुरी ।
शक्ति श्री मज द्या, प्रपंची सुख द्या
शांती मनाला खरी ।।

—श्री. दा. र. दळवी.
५।७८, बी. पी. टी. कॉलनी रेनॉल्डस रोड
वडाळा, मुंबई ४०० ०३७.

※ ※ ※

# प्रभो साईनाथ

प्रभो साईनाथा दे चरणी आसरा
नको येरझारा । नको जन्म मरण फेरा ।।
याची जन्मी देवा । नाम निरंतर ठेवा ।
हेचि दान देवा । मागणे मागते ।
श्रद्धा भक्ति वाढो । नित्य घडो सेवा ।
माया ममता नाती । नको आता साई ।
तुझी साई मूर्ती । नित्य हृदयी राहो ।
अचल निश्चल । एक तुच साई प्रभो ।

—सौ. कलावती वसंतराव चव्हाण.
बी।६ अंबाबाई मेस्त्री निवास,
सेनापती बापट मार्ग,
दादर, मुंबई नं. ४०० ०२८.

# साईनाथ नाम तुझे गोड लागु दे

(भजन – चाल – कोण दिवस येई कसा कोण जाणतो
श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे)

श्री साईनाथ नाम तुझे गोड लागू दे ॥धृ.॥

तुझ्या नामाची गोडी, लागो या पापी मना ।
डोळ्यांनी मूर्ती सदा सतत पाहू दे ॥१॥

दुर्बल हे मन माझे, विषयाने भरले खरे ।
यातूनी मुक्त व्हाया, तुझे ध्यान लागू दे ॥२॥

संतांची माया खरी, भक्तांचा उद्धार करी ।
बाबा तुझी सेवा खरी, आम्हां घडू दे ॥३॥

बाबांचे मंदिरात, जाऊनि दिवस रात ।
भजन गात गात तुझे, तल्लीन होऊ दे ॥४॥

संसार कठीण फार, स्वार्थ हा करितो जोर ।
बाबांना सदा नमस्कार, तुझी सेवा घडू दे ॥५॥

श्री साईनाथ नाम तुझे गोड लागू दे.

–श्री. वासुदेव त्र्यंबकराव काळे,
सर्व्हेअर
केळकर वाडी. वा. नं. ३, वर्धा.

★

# साईचे ऋण

शिरडीग्रामी पुण्य अवतरे
परमेश्वर साई परमेश्वर साई
बंधू भाव शिकवूनी जनासी
भक्ती मार्ग देई ॥१॥

लग्न वऱ्हाडी आले चालत
वस्ती मशिदीसी—वस्ती मशिदीसी
गुरु आज्ञा मानूनी राहिले
साई शिरडीसी ॥२॥

यवन की हिंदू मनात किंतू
ग्रामस्थे छळिले – ग्रामस्थे छळले
त्या सर्वांवरी कृपा करोनी
त्यासी उद्धरीले ॥३॥

पृथ्वीवरले कार्य संपले
गेले शिलंगणाला—गेले शिलंगणाला
विजया दशमी मुहूर्त साधूनी
देह त्याग केला ॥४॥

सजीव नसूनी नित्यहि जागृत
भक्ता ताराया – भक्ता ताराया
सजीव असता वदले जे ते
बोल खरे कराया ॥५॥

जोडे करूनी चर्माचे मम
घाली तव पाया – घाली तव पाया
न फिटे ऋण तरी गेले कोटी
जन्म जरी वाया ॥६॥

—जयंती यादव जोशी
जावळे भुवन, भवानी शंकर रोड
दादर, मुंबई ४०००२८

# परीसपदी

★★★卐★★★☆★★★

बाळ काय कारणे रडावा
आईला ना प्रश्न पडावा ।।

तदवत् माझ्या मनात चिंता
तर मग धीर मी का सोडावा ।।

चिंतामणी जर कुणा लाभला
उगा कशाला कोण रडावा ।।

सावरणारे हात जर बळकट
तोल कुणाचा का बिघडावा ।।

परमप्रिय जे चरण अखंडित
बाबांचा सहवास घडावा ।।

दिशाहीन रस्ते रात्रीचे
साईचरणांचा ध्रुव निवडावा ।।

भवसागर जर तरून जाणे
सारंग शिर्डीचा पकडावा ।।

बाबा साईचरणी क्षणोक्षण
दंडवत माझा अखंड घडावा ।।

नरदेहाचे जर सोने होणे
परीसपदी या देह पडावा ।।

—श्री. बी. जी. चव्हाण.
कनकवाडी (गारगोटी) ४१६ २०९.

☆

# नमन

साईनाथा नमन तुझे चरणी माथा ।
उज्वल बालक भाग्यविधाता ॥धृ.॥

निर्मळ गंगा भरली नयनी
न्हाऊ घालिते भाव फुलांनी
हर्षित घट अंतरी भगवंता ॥१॥

भावगीतांची गुंफली माला
जनक जननी अर्पिली तुजला
भरली तुज कलेची दिव्यता ॥२॥

हृदय निरांजन देह तबकात
लाल भास्करी लाविली ज्योत
ओवाळी कर कमलांची देवता ॥३॥

विद्या पेरणी दे मज मति
उल्हास भक्त वाढविल गती
भावी गुणाची वाणी सत्यता ॥४॥

—सौ. शकुंतला शंकरराव रामटेके.
टंटखाना ले आऊट, दहिपूरा,
वराडे भवन प्लॉट नं. ३२७,
नागपूर ९.

## दिवाळी शुभचिंतन

येती दिवाळी व नूतन वर्ष आमच्या सर्व साईभक्तांना' वाचकांना, लेखक-कवींना, जाहिरातदारांना व हितचिंतकांना सुखाचे' समृद्धीचे व श्री साईभक्ती वृद्धिगत करणारे जावो.

— संपादक

जीवनातील आधारस्तंभ होते. त्यामुळे त्यांच्या अवती–भवती असणाऱ्या सर्वांना आपले जीवन शून्यवत झाले, अर्थहीन झाले, असे वाटले.

श्री साईबाबांचे परमभक्त नानासाहेब चांदोरकर, रोज भाकरी देणारी लक्ष्मीबाई, बाबांच्या सदैव सान्निध्य असणारे देशपांडे (शामा) बयाजी पाटील इ. अनेक भक्तमंडळी ही एका अर्थाने धन्य होत. कारण त्यांना प्रत्यक्ष साई-बाबांचा सहवास लाभला. साईबाबा हे थोर सत्पुरुष होत. ज्यांच्या कृपा-दृष्टीची आज आपण अपेक्षा करतो अशा थोर विभूतीला त्यांनी आपल्या डोळ्यांने पाहिले, त्यांच्या सान्निध्यात काही काळ घालविला. प्रत्यक्ष ईश्वरा-च्या स्वरूपाला चालता बोलताना त्यांनी पाहिले आणि आपली दृष्टी पावन केली. सहवास लाभणे ही भाग्याचीच गोष्ट आहे.

साईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेले, त्यांच्या महानिर्वाणप्रसंगी असणारे भक्त आज असण्याची शक्यता फारच कमी. आपल्याला व यापुढील भक्तांना मात्र वर्णने वाचून ती कल्पनेने साकार करावी लागतात.

पण साईबाबा हे खरोखरच आपल्यातून गेले कां? श्री बाबा हे अवतारी पुरुष होते, ज्या कार्यासाठी, त्यांनी अवतार घेतला ते कार्य संपताच त्यांनी आपल्या जड देहाचा त्याग केला. साईबाबा हे स्वतःसाठी जगले नाहीत, व स्वतःसाठी मेले पण नाहीत. चंदनाप्रमाणे त्यांनी लोकसेवा करून, आपला देह झिजविला. लोकसेवेचे लोकोद्धाराचे व्रत त्यांनी अंगीकारले होते. दुसऱ्याचे दुःख दूर करण्यात त्यांनी आपले जीवन व्यतीत केले. त्यांच्याभोवती अनेक जातीधर्मांची माणसे होती, अनेक थरातील होती, पण साईबाबा सर्वांना समानतेने वागवित. आधी केले, मग सांगितले या उक्तीप्रमाणे ते स्वतः कृती करीत. ते स्वतः हिंदु–मुसलमानांचे सण सारख्याच उत्साहाने साजरे करीत. एकाच थाळीत कुत्रा, मांजर, पशुपक्षी यांच्यासमवेत भाकर तुकडा खाऊन, त्यांचे उष्टे पाणी प्राशन करून सर्व ठिकाणी एकच आत्मा आहे, हे त्यांनी दाखवून दिले. श्रीबाबांना अनेक सिद्धि प्राप्त होत्या. त्याद्वारे त्यांनी पुष्कळ चमत्कार केले, व आजही होत आहेत कारण चमत्कारामुळे मनुष्याच्या मनात लवकर श्रद्धा निर्माण होते हे त्यांना माहित होते. म्हणून अनेक गोष्टी आपल्या लीलेद्वारे त्यांनी केल्या. त्यामुळे लोकांच्या मनात आस्तिक–भावना निर्माण झाली.

# श्री साईबाबांकडे काय मागावे

-श्री. लक्ष्मण सदाशिव नाईक.
(अध्यक्ष श्रीसाईलीला लेखक-कवी संमेलन १० वे)
धन्वंतरी नगर, इंदूर (म. प्र.).

० श्री साईबाबांकडे काय मागावे हा विचार मनामध्ये येताच मन गोंधळून जाते. संसारातील वस्तू मागण्याचे मनात येताच हे काय मागतो आहे कारण हे सर्व नाशवंत असून मिळालेल्या वस्तुचा आनंद क्षणभर टिकतो. मग चीर आनंद कशात आहे ह्या विचाराने मन विचलित होते.

श्री साईलीला मासिकातील अनुभव वाचल्यावर श्री साईबाबा" भक्तांचे संकट दूर करण्याकरिता, वेळोवेळी धावून गेले व भक्तांची श्रद्धा दृढ होऊन क्षणिक सुखाचा आनंद वाटला. श्री साईबाबा म्हणत की "ज्याची दुकान घालून आहे त्याचा एक गिऱ्हाईक येत नाही. आपण सर्व संसारी आहोत. ऐहिक सुखाचे ग्राहक. श्री साईबाबांकडे धावतो जे सुख व आनंद क्षणिक असत, परंतु चीर काल टिकणारा आनंद, सुख कशात आहे ह्याबद्दल विचार करीत नाही. संसारी मनुष्य माया मोहात गुंतल्याने त्यातून निघण्याचा मार्गच त्यास सापडतच नाहीं. हा मार्ग काढण्या करिता 'श्री साईबाबा' सारख्या संताना शरण जावयास हवे. ह्याशिवाय कलीयुगात नामस्मरणा शिवाय दुसरा मार्ग नाहीं. म्हणून आपण सर्व मानवाने श्री साईबाबांचे नामाचा जप करणे आजच्या संसारी जगात अगदीच सोपे साधन आहे. आपले मन काम, क्रोध, मोह, मत्सर या षड् रिपूने बरबटले आहे श्री साईबाबांचे नाम स्मरणाने अंतःकरण स्वच्छ होऊन आनंद आणि सुखाचा मार्ग दिसू लागेल.

**श्री साईसच्चरित्रातील ओवी "कुंती पाच पांडवांची आई अज्ञात आणि वनवासा पाई कष्टली जरी, अनंत पाई प्रार्थी देवाते, म्हणे देवा परमेश्वरा सौख्य मागती त्याला द्या. मला दुःख, परन्तु तुझ्या नावाचा विसर पडू देऊ नको हेच देवा मला दे."**

आपणही साईबाबांपाशी हेच मागू या की तुमच्या नावाचा अखंड जप अंतःकरणात चालू दे, त्याचा विसर क्षणभर सुद्धा पडू देऊ नको. श्रीसाई

सच्चरित्रात श्री बाबा सांगतात की, "साई साई म्हणाल सात समुद्र करीन निहाल", आपण सर्व भक्त साईबाबांचा नावाचा जप बाबांकडे मागू या.

हे नामस्मरण करण्यास काळ, वेळ वगैरे कशाही प्रकारची जरूरत नाहीं. नाम:स्मरण कोणालाही कोठेही बसून करता येते. म्हणून मानवाने श्री साईबाबांकडे त्यांच्या नावाचा जप (नाम;स्मरण) करण्याची मागणी करावी.

"जय श्री साईनाथ"

★

# श्रीबाबांचे निर्याण

—साईनंद

० बाबांचे निर्याण आक्टोबर महिन्यात झाले. २८ सप्टेंबर पासून बाबांना २–३ दिवस ताप आला. त्यानंतर बाबांनी अन्न वर्ज केले. त्यांचा नित्यक्रम पूर्वीप्रमाणेच चालू होता. मध्यान्हीच्या आरतीनंतर निकटची भक्तमंडळी बाबांच्या बरोबर जेवण्यासाठी रोज थांबत असत. परंतु १५ आक्टोबर रोजी आरती झाल्यावर बापूसाहेब, काकासाहेब वगैरे भक्त श्रेष्ठींना घरी जेवावयास जाण्याची आज्ञा झाली. बहुतेक मंडळी घरी गेली. थोडी मंडळी मागे राहिली. लक्ष्मीबाई घरी गेली नाहीं. तिला बाबांनी ९ रु. दिले व ते म्हणाले, "मला येथे बरे वाटत नाहीं. मला वाड्यात (बुट्टी वाडा) घेऊन चला." नंतर ते बयाजीच्या अंगावर रेलले. त्यांचा श्वासोच्छास हलका होऊ लागला. भागूजीने हे नानासाहेबांस सांगितले. निमोणकरांनी थोडे पाणी पाजले. पण ते बाहेर आले. निमोणकरांनी 'देवा' म्हणून मोठ्याने किंकाळी मारली. बाबांनी क्षणभर डोळे उघडून पाहिले व 'आँ' (होकारार्थी) असे म्हटले, दुपारी २–३५ वाजता

बाबांचे निर्याण झाले. रात्रभर गाभारा (समाधि) खोदण्याचे काम चालू होते. बुधवारी एकादशीच्या दिवशी संध्याकाळी श्रींचा देह समाधित ठेवण्यात आला. निर्याण झाले त्या दिवशी रात्री दासगणूंना दृष्टांत झाला की माझ्या अंगावर वल्खळ फुले घालण्यास या.

श्रींचा देह २४ तास राहूनसुद्धा ताठ झाला नाहीं, हात, पाय मोकळे-पणे हालू शकत होते, कफनी फाडून काढावी लागली नाहीं. दुसऱ्या दिवशी तोंडातून थोडे रक्त येत होते. शेवटची कफनी आपले घरी (बुट्टींचा वाडा) आहे.

निर्याणापूर्वी ४–५ दिवस आधी सोनीच्या आईस बाबांनी सांगितले, मला मशिदीचा व चावडीचा कंटाळा आला आहे, आता मी वाड्यात जाऊन बसेन. तेथे भेट. लोक (भक्त मंडळी) माझा सांभाळ करतील. बाबांचे शब्द किती सत्य आहेत हे आज शिर्डीकडे पाहिल्यास सहज लक्षात येईल. (सा. ली. व. १ अं. ११ वरून).

# श्रीसाईलीला

## पुढील अंक भक्त अनुभव विशेषांक

श्री साईलीलाचा नव्हेंबर–डिसेंबर १९८४ चा अंक हा श्रीसाईबाबा भक्त अनुभव विशेषांक म्हणून १ नव्हेंबर रोजी प्रकाशित होईल. दरवर्षी-प्रमाणे डिसेंबरचा अंक बंद राहिल.

पृष्ठसंख्या १२८) (किमत अवघी दोन रुपये

## श्री साईबाबा ६६ वा पुण्यतिथी महोत्सव

यंग बॉईज स्पोर्टस् क्लब सी. जी. एस्. कॉलनी काणे नगर, मुंबई ३७, या मंडळाच्या विद्यमाने दिनांक ४ ऑक्टोबर १९८४ ते ८ ऑक्टोबर १९८४ पर्यंत "श्री साईबाबांचा ६६ वा पुण्यतिथी महोत्सव'. साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने आयोजित केलेल्या विविध स्पर्धातील विजयी स्पर्धकांना बक्षिसे वाटण्यात येतील. तसेच विविध करमणूकीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्वांनी हेच आमंत्रण समजून कार्यक्रमास उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा व कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती.

आपला नम्र
श्री. नामदेव शंकर मळीक
प्रमुख कार्यवाह

# शिरडी वृत्त–माहे जुलै १९८४

या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता श्री साईबाबांचे दर्शनासाठी, आलेल्या साईभक्तांची तसेच पंढरपूर यात्रेस जाणारे व पंढरपूरहून येणारे अशा साईभक्तांची खूपच गर्दी झाली होती. हा उत्सव बुधवार ११–७–८४ ते शुक्रवार १३–७–८४ पर्यंत समाधी मंदिरात मोठ्या थाटाने साजरा झाला. नामांकित कलाकार सौ. रजनीताई जोशी, अजित कडकडे, हरीओम शरण, मुंबईचे श्री. जयवंत कुलकर्णी वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांचे कीर्तन झाले.

**गुरुपौर्णिमा उत्सव – पहिला दिवस :–** बुधवार ११–७–८४ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५–१५ वा. काकड आरती झाली. सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरवात झाली. श्रीं चे स्नान, अभिषेकपूजा, आरती झाल्यानंतर दुपारी ४–३० ते ६–३० पर्यंत ह. भ. प. श्री. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. रात्री ७–३० ते ९–०० व ९–३० ते ११–०० पर्यंत सौ. रजनीताई जोशी, अजित कडकडे, कृष्णा चारी, सौ. निर्मला गोगटे, श्रीमती कान्होपात्रा किणीकर मुंबई यांचे गायन झाले. रात्रौ ९–१५ वा. श्रींच्या पालखीची मिरवणूक निघाली. पालखीस आकर्षक रोषणाई करण्यात आली होती रात्री ११–०० वा. पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यानंतर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस –** गुरुवार दि. १२–७–८४ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे साईभक्तांची गर्दी बरीच होती. ५–१५ वा. काकड आरती सुरू झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची अध्याय वाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधी मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. नित्याचे कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४–३० ते ६–३० पर्यंत ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास यांचे कीर्तन झाले.

सायंकाळी ७–३० वा. धुपारती झाल्यानंतर रात्री ९–१५ वा. श्रींच्या रथाची मिरवणूक समाधी मंदिरातून वाद्यांचे गजरात निघाली. सनई चौघडा, टाळ, मृदुंग, गायन भजन, राहाता बँडपथक, कोपरगाव. झांज–नगारा पुणे येथील मयूर बँड व न्यू गंधर्व बँड पथक, डफ, ढोल अशा थाटात लाईटने सुशोभित केलेला रथ संस्थानचे गुरुस्थान नजिक आला. त्या ठिकाणी संस्थान कर्मचारी, साईभक्त व ग्रामस्थ लोक यांनी भारूड गारूड कार्यक्रम केले. भारूड गारूड कार्यक्रमात सर्वश्री श्री. तुकाराम परदेशी, एकनाथ पा. कोते, रविंद्र जोशी, किसन हनमंता पा. गोंदकर यांनी भाग घेतला. पुण्याचे श्री. रघुनाथ सांडभोर, सिने–कलाकार यांनी नकला कार्यक्रम केले, त्यानंतर रात्री १२–३० वा. रथ मिरवणूक समाधी मंदिरात आली. मिरवणूकीतील भक्त लोक कलाकारांच्या कार्यक्रमात सामील झाले. साईभक्तांना दर्शनासाठी मंदिर रात्रभर उघडे ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा ३ रा दिवस** – शुक्रवार दि. १३–७–८४ रोजी सकाळी ६ वा. श्रींचे मंगल स्नान झाले. ७–३० ते ८–३० पर्यंत गुरुस्थान येथे रुद्राभिषेक झाला. ११ ते १२–०० पर्यंत ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांचे काला कीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली. व साईभक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७–३० ते १०–०० पर्यंत श्री हरीओम शरण मुंबई यांचे गायन झाले. त्यानंतर शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

काहीं कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :–

**कीर्तन :–** १) ह. भ. प. सौ. ललीतप्रभा कुलकर्णी, गणेशपुरी.
२) ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास.
३) ह. भ. प. दत्तोबा गाडेकर, पारेगाव.
४) ह. भ. प. श्री. दत्तोबा शंकर घुमरे, खेडलेझुंगे.
५) ह. भ. प. विश्वनाथ महाराज सुराळेकर, सरलाबेट

**प्रवचन –** १) ह. भ. प. मुरलीधर महाराज देशमुख, शिरडी.

**भजन, गायन, वादन, नृत्य, नकला वगैरे :–** १) श्री भगवती साई संस्थान कुर्ला, मुंबई. २) श्रीकांत दामोदर जेऊरकर. ३) कु. मुग्धा दामोदर जेऊरकर

४) सौ. शैला रानडे, ठाणे. ५) श्री. ए. सुदर्शन, हैद्राबाद. ६) श्री लक्ष्मी-नारायण पवार, इंदौर. ७) श्री. एस. के. सक्सेना, दिल्ली. ८) श्री. एम. के. सक्सेना, ९) कु. कुसुम दिल्ली. १०) श्री. नरेश मादुरकर, पुणे. ११) सौ. मंगला सुधीर पाहे' पुणे. १२) श्री. हिंदुस्तानी भजनी मंडळ, पिंपळगाव. १३) श्री. तुकाराम माधवराव दैठणकर, पुणे. १४) श्री. मधुकरराव गोपाळ सोनवणे, बडोदा. १५) श्री. सुनील श्यामराव लोणकर, पुणे. १६) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर' परेल. १७) डॉ. श्री. कीर्तीकर, मुंबई. १८) श्री. चंद्रसेन साळगावकर, मुंबई. १९) श्री. शिवाजी तुकाराम धुमाळ, शिर्डी. २०) श्री. रजनीताई जोशी, ठाकूरद्वार मुंबई. २१) श्री. अजित कडकडे, सांताक्रूझ, २२) सौ. निर्मला गोगटे, मुंबई २३) श्रीमती कान्होपात्रा किणी-कर, ताडदेव. २४) श्री. कृष्णा चारी, सांताक्रुझ. २५) श्री साई बॅन्कर, मुंबई. २६) श्री. मकरंद कुंडले, शिवकानगर. मुंबई. २७) श्री. दामूअण्णा दळवी. श्रीरामपूर. २८) श्री अशोक दामूअण्णा दळवी, श्रीरामपूर. २९) श्री. ज्ञानोबा जगन्नाथ नगरकर, पुणे. ३०) श्री. जितेंद्र गंगाधर जाधव, पुणे. ३१) श्री. पारसमल पोरवाल, शिर्डी. ३२) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. ३३) श्री. रावसाहेब देशमुख, अमरावती. ३४) श्री. महेश जनार्दन कुलकर्णी, पुणे. ३५) सौ. सुचीता रमेश पिळणकर, मुंबई. ३६) श्री. रमेश पिळणकर, मुंबई. ३७) श्री. राज श्रीनिवास नायकर, घाटकोपर. ३८) श्री. एस. के. भालेराव, मुंबई. ३९) श्री. दत्ता नरहरी देवळणकर, पुणे. ४०) श्री. महादेव तुकाराम तुपे, पुणे. ४१) डॉ. खानविलकर, लोणावळा. ४२) कु. अर्पणा अशोक खानविलकर. ४३) कु. प्रिया अशोक धनवे. ४४) श्री. विजय हजारे, बोरीवली. ४५) श्री. संजय परळकर. ४६) श्री. प्रकाश यशवंतराव कोकाटे, कोल्हापूर. ४७) श्री. देवीदास वाघचौरे. ४८) श्री. गोविंद लोणकर, पुणे. ४९) श्री. जयवंतराव कुलकर्णी, मुंबई. ५०) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. ५१) श्री. मोहनराव कलंकी, मुंबई. ५२) श्री. अनंतराव पांचाळ, मुंबई. ५३) श्री. मनोहर गडसे. ५४) श्री. किसनदास कपूरचंद दुगड, अहमदनगर. ५५) श्री. वसंत कृष्णा साळुंके, मुंबई. ५६) श्री. गजानन दैठणकर, पुणे. ५७) श्री. एस. बी. भोसले, मुंबई. ५८) श्री. दौलतभाई मुंबई. ५९) श्री.

सुर्यकांत तळेकर, मुंबई. ६०) श्री दिलीप नाईक, मुंबई. ६१) श्री. भीमराव नामदेव साळुंके. ६२) श्री. गोकुळ राहुरकर, मुंबई ६३) श्री. दत्तात्रय छगनराव पंडीत, पुणे. ६४) अशोक माधवराव दैठणकर, पुणे. ६५) श्री. तुकाराम माधवराव दैठणकर, पुणे. ६६) श्री. मनोहर रघुनाथ पंडीत. ६७) श्री. राजेश मधुकर अमरे' राजापूर ६८) श्री. वसंत घुमकर, मुंबई. ६९) सौ. रेखा मांडवी, अहमदनगर. ७०) श्री. वसंतराव देवळणकर, पुणे. ७१) श्री. अशोक लक्ष्मण नार्वेकर, मुंबई. ७२) श्री. शेखर नश्वर विसपुते, शिर्डी. ७३) श्री. प्रदिप विष्णू जाधव, मुंबई. ७४) श्री. आर. एम. मिराळे, शिर्डी. ७५) श्री. अब्दुल कादर निजामी, पुणे. ७६) श्री. शिवाजी तुकाराम धुमाळ, शिर्डी. ७७) श्री. राजेंद्र गंगाधर जाधव, पुणे. ७८) मिस्त्री अब्दुल्ला कासीम, पुणे. ७९) श्री. चंद्रकांत साळगावकर, शिर्डी. ८०) सौ. गीजरेबाई, शिर्डी. ८१) श्री. रामदास ओंकार अहिरराव, हणमंतगाव, ८२) श्री. एम. डी. मन्सुरील, पैठण. ८३) श्री. चंद्रकांत अनंत गवंडे, मुंबई. ८४) श्री. शिवाजी बापूजी घोलप, हणमंतगाव. ८५) श्री बी. ए. चव्हाण, गंगापूर. ८६) विमलताई भाऊसाहेब शिर्के, जळगाव. ८७) श्री. छबूराव बाबूराव आहेर, हणमंतगाव. ८८) श्री. डी. एम. पाटील, अंगापूर. ८९) श्री. ज्ञानबा तात्या वाडेकर, शिर्डी. ९०) श्री. शेख नबाब उमरपटेल, अस्तगाव. ९१) श्री. अरुण सोमानी, संगमनेर. ९२) श्री. शिवराम बिडवे, संगमनेर. ९३) श्री. सदाशिवराव जाधव, सांगली. ९४) श्री. ज्ञानेश्वर रामचंद्र वैद्य, शिर्डी. ९५) श्री. ललितकुमार जोशी, शिर्डी. ९६) श्री. शिवाजीराजे कदम. ९७) श्री. शांताबाई वाघ, ९८) कु. भागश्री अनिलराव रावकनकर, वैजापूर. ९९) श्री प्रमोद सीताराम शेरे. १००) श्री. भास्कर यशवंत वराडकर. १०१) कामिनी अग्नीहोत्री, १०२) डोऱ्हाळे भजनी मंडळ, डोऱ्हाळे. १०३) श्री. अशोक आव्हाव, पुणे. १०४) श्री. राजाभाऊ देशपांडे, पुणे. १०५) श्री. दिगंबरराव भातोडे, राहाता. १०६) श्री भानुदास चाफेकर, कुकाणा. १०६) श्री. अप्पासाहेब सामंत, मुंबई. १०७) श्री. जयवंत उत्पात, लक्ष्मी-वाडी. १०८) श्री. बाळू कुलकर्णी, लक्ष्मीवाडी. १०९) श्री. मनोहर लोणकर,

पुणे. ११०) श्री. मधुकर गोपाळराव सोनवणे, बडोदा. १११) श्री. गंगाधर जाधव, पुणे. ११२) श्री. बाळासाहेब दत्तात्रय राऊत, नगर. ११३) श्री. रामकृष्ण सखाराम सालकर, कोपरगाव. ११४) श्री. सखाराम राघूजी सालकर कोपरगाव. ११५) श्री. विष्णू दयाळ ११६) श्री. दिलीप विडवे, नासिक. ११७) श्री. सुनील लोणकर, पुणे. ११८) श्री. अशोक नानासाहेब कोराटे, शिर्डी. ११९) श्री. प्रसाद सुर्यकांत हुंडे, पुणे. १२०) श्री. सुरेश शामराव लोणकर, पुणे. १२१) श्री. जयंता जगन्नाथ नगरकर. १२२) श्री. रंजन शंकरराव लांजेकर, १२३) न्यू गंधर्व ब्रास बँड, पुणे. १२४) श्री. सुरेश बबनराव आढाव. पुणे. १२५) मयूर ब्रास बँड, पुणे. १२६) भारत स्काऊटस अँड गाईडस, वेस्टर्न रेल्वे गट, लोअर परळ, मुंबई. श्री. वसंत घुमकर, रोवर लीडर. १२७) मध्य रेल्वे गट श्री. बी. वी. गंगावणे, लीडर. १२८) श्री. सुरेश राजाराम आंजर्लेकर, मुंबई. १२९) श्री. शशिकांत एकनाथ दळवी, मुंबई. १३०) श्री. सतीश राव, मुंबई. १३१) श्री. विलास महाडीक. १३२) श्री. वसंत बाळाराम जोशी. १३३) श्री. विलास पावसकर. १३४) श्री. वसंत नाईक. १३५) श्री. बारकूशेठ मांडवकर. १३६) श्री. विलास परळकर. १३७) श्री. विवेक मुळे. १३८) श्री. शिवराम शिरोडकर. १३९) श्री. सुभाष कांबळी. १४०) श्री. बारावकर, ब्रदर्स, शिर्डी. १४१) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी. १४२) श्री. शाम मिराणे, शिर्डी. १४३) श्री. चतुर्धन नागरे, शिर्डी. १४४) श्री. माणिक साळी. १४५) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव, शिडी. १४६) श्री. हरीओम शरण, मुंबई. १४७) सौ. नंदिनी शरण. १४८) श्री. माधव पवार. १४९) श्री. दिपक बोरकर. १५०) श्री. वसंत हाटकर. १५१) श्री. आल्हाद हाटकर. १५२) श्री. म. वा. पवार. १५३) श्री. सुरेश गमरे. १५४) श्री. रमेश गोताड. १५५) श्री. प्रदीप रासने, अहमदनगर. १५६) डॉ. ठोसर, अमरावती. १५७) नलिनी के. दवे, १५८) श्री. किशोर अमेंबल, पुटपर्ती. १५९) सौ. शरयू साईदास मराठे. १६०) सौ. सुलभा रंगनाथ, नांदेड. १६१) कु. शीतल रविंद्र वाणी, शिर्डी. १६२) श्री. कचरू बापू गडाख, पारेगाव. १६३) श्री. बाबूराव गोर्डे, पारेगाव. १६४) श्री.

काशिनाथ बिडवे, पारेगाव. १६५) श्री. चांगदेव भिकाजी गडाख, पारेगाव. १६६) श्री. रंगनाथ भागोजी सोमवंशी, लव्हारे. १६७) श्री. विशाल वेंकटालचम, दिल्ली. १६८) श्री. राजेश नागजी, मुंबई. १६९) श्री. गिरीराज पंडीत, मुंबई. १७०) सौ. मंगला गिरीराज, मुंबई. १७१) श्री. पिंपळवाडी भजनी मंडळ, पिंपळवाडी. १७२) श्री. दत्ताराम विठ्ठल घाग, मुंबई. १७३) श्री. प. पु. गुरुदेव काटे स्वामी, पांचगणी. १७४) श्री. भास्कर दगडू काळे, देहरे. १७५) श्री. भास्करन, आंध्रप्रदेश. १७६) श्री. इमानली शहा, बऱ्हानपूर.

**हवापाणी** – शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काहीं नाहीं शिरडीत पावसाचे प्रमाण कमी आहे.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. खर्च रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२–०० | ३–० |
| २) | ,, | इंग्रजी | १३–५० | ४–० |
| ३) | ,, | हिंदी | १२–०० | ४–० |
| ४) | ,, | गुजराथी | १२–०० | ४–० |
| ५) | ,, | कन्नड | १०–०० | ४–० |
| ६) | ,, | तेलगू | १३–०० | ४–० |
| ७) | ,, | तामीळ | १२–०० | ४–६ |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७–५० | ३–० |
| ९) | ,, | हिंदी | ७–०० | ३–५ |
| १०) | ,, | गुजराथी | ४–२५ | ३–० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४–०० | ३–० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०–३५ | ३–० |
| १३) | ,, | गुजराथी | ०–३० | ३–० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०–५० | ३–० |
| १५) | ,, | गुजराथी | ०–५० | ३–० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १–२५ | ३–० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५–०० | ३–० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०–७५ | ३–० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४–०० | ३–० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४–५० | ३–० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १–७५ | ३–० |
| २३) | ,, | इंग्रजी | १–७५ | ३–० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १–५० | ३–० |
| २६) | ,, | हिंदी | १–७५ | ३–० |

Regd. No. [illegible]
LICENCE No. 15
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ठ ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०—१० | ३—०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५—२५ | ३—०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १—५० | ३—०० |
| ३०) | " | मराठी | १—५० | ३—०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराती | १—५० | ३—०० |
| ३२) | " | हिंदी | छपाई चालू | नाही. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०—१० | ३—०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी
१०—०० प्रत्येकी अंक १—००
(व्ही. पी. नी पाठवत नाही)

| अ. क्र. | फोटोचे नाव | फोटो साईझ | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०" | १—६५ | ३—०० |
| २) | " | १०"×१४" | १—१० | ३—०० |
| ३) | " | ७"×१०" | ०—५५ | ३—०० |
| ४) | " | ४"×५" | ०—२० | ३—०० |
| ५) | " | २"×३" | ०—१५ | ३—०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १—६५ | ३—०० |
| ७) | " (काळा पांढरा) | १४"×२०" | १—६५ | ३—०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २—७५ | ३—०० |
| ९) | " | १३"×१८" | १—७० | ३—०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | २०"×२०" | १—१० | ३—०० |
| ११) | " (काळा पांढरा) | २०"×१४" | ०—८५ | ३—०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो , | ९"×१२" | १—१० | ३—०० |
| १३) | " (रंगीत) | ९"×१२" | १—६५ | ३—०० |
| १४) | शिळा | ९×१३ | ०—७५ | ३—०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पष्ठ्याचे कॅलेंडर | — — — | १६—०० | ८—०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई१४.